**सुविचार**
अन्य आत्माओं को प्रेम व दया का दान भी एक तरह का दान है ।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. १२ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१११ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## शिवराज पाटील यांचे लातूरला आगमन



लातूर / प्रतिनिधी- देशाचे माजी गृहमंत्री, लोकसभाअध्यक्ष व पंजाबचे राज्यपाल श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांचे आज रोजी सकाळी आगमन झाले. विविध कार्यक्रमानिमित्त त्यांचा लातूर दौरा आहे. त्यांचा कांही दिवस लातूर येथे मुक्काम असणार असल्याचे त्यांचे सचिव श्री. शाम साखरे यांनी कळवले आहे.

# मोदी सरकारची मोठी घोषणा
# सीएए ची अधिसूचना जारी

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीआधी केंद्र सरकारने मोठी घोषणा केली आहे. मोदी सरकारने सीएएची म्हणजेच नागरिकत्व सुधारणा विधेयकाची अधिसूचना जारी केली आहे. सरकारने याबाबतची अधिकृत घोषणा केली. यानुसार देशातात सीएए लागू झाला आहे.

या कायद्यामध्ये भारताच्या शेजारील पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांमधील अल्पसंख्याकांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. यासाठी केंद्र सरकारने पोर्टल तयार केले असून त्यावर ऑनलाईन अर्ज करावा लागेल.

याआधी भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी एखाद्या व्यक्तीला भारतात ११ वर्षे राहणे गरजेचे होते. मात्र आता या कायद्यान्वये हा कालावधी ६ वर्षांवर येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी मोदी सरकारने हा अतिशय मोठा निर्णय घेतला आहे.

२०१९मध्ये संसदेत नागरिकत्व सुधारणा कायदा मंजूर झाला होता. मात्र या मंजुरीनंतर देशभरात बऱ्याच ठिकाणी यांच्याविरोधात आंदोलने झाली. विरोधकही या कायद्याच्या विरोधात होते. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी झाली नव्हती. या कायद्यामुळे भारताच्या शेजारील देशातून येणाऱ्या इतर धर्मीयांना भारताचे नागरिकत्व मिळणार आहे.

यासाठी केंद्र सरकारकडून वेब पोर्टल तयार करण्यात आले आहे. यामध्ये बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान येथील नागरिकांचा समावेश असेल. या वेब पोर्टलवर नागरिकांनी नोंदणी करणे गरजेचे आहे. त्यानंतर सरकारकडून योग्य ती तपासणी प्रक्रिया केली जाईल. त्यानंतरच संबंधित व्यक्तीला भारतीय नागरिकत्व मिळेल.

## राज्यात आतापर्यंत सुमारे ९८ लाख टन साखर उत्पादन

पुणे : राज्यात यंदाच्या ऊस गाळप हंगामात २०७ खाजगी व सहकारी साखर कारखान्यांनी मिळून आतापर्यंत ९६६ लाख टन उसाचे गाळप केले आहे. या गाळपातून आतापर्यंत ९७.७ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे.

तर सरासरी साखरेचा उतारा १०.११ टक्के इतका मिळाला आहे. राज्यात आतापर्यंत ३३ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली असून सर्वाधिक ९ कारखाने सोलापूर विभागातील तर संभाजीनगर विभागातील ८ कारखाने बंद झाले आहेत. कोल्हापूर विभागाने आतापर्यंत २५ लाख टन साखर उत्पादित केली असून या विभागाचा सरासरी साखर उतारा सर्वाधित ११.४५ इतका आला आहे.

राज्यात यंदा २०७ सहकारी व खाजगी कारखान्यांनी रोजगार परवाना घेतला होता त्यातील त्यात १०३ सहकारी व १०४ खाजगी साखर कारखाने होते. या साखर कारखान्यांनी आतापर्यंत ९६६.८२ लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यातून ९७.७ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्याचा सरासरी साखर उतारा १०.११ इतका आला आहे. सर्वाधिक साखर उतारा कोल्हापूर विभागात ११.४५ टक्के असून त्या खालोखाल पुणे विभागाचा साखर उतारा १०.३९ टक्के इतका आहे. नांदेड विभागात यंदा विक्रमी १०.०९ टक्के साखर उतारा आला आहे.

कोल्हापूर विभागाने आतापर्यंत २२३ लाख टन ऊस
**(पान २ वर)**

# या दिवसापासून लागू होणार आचारसंहिता

नवी दिल्ली : देशातील सर्वांच्याच नजरा महत्त्वपूर्ण अशा लोकसभा निवडणुकीकडे लागल्या आहेत. राजकीय पक्षदेखील यासाठी कंबर कसून तयारी करत आहेत. त्यातच आता यासंबंधी निवडणूक आयोगाच्या महत्त्वाच्या बैठकीची तारीख ठरली आहे. १५ मार्च रोजी ही बैठक पार पडणार असून १८ मार्चनंतर आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यानंतर निवडणुका जाहीर होतील. तसेच १५ मार्चच्या बैठकीमध्ये केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या रिक्त जागा भरण्यात येणार आहेत.





देशातील लोकसभेच्या निवडणुका या १८ मार्च किंवा त्यानंतर जाहीर होण्याची शक्यता आहे. याचं कारण म्हणजे केंद्रीय निवडणूक आयोगाची बैठक ही शुक्रवारी १५ मार्च रोजी होणार आहे. त्यानंतर शनिवार आणि रविवारी सुट्टी असून सोमवारी किंवा त्यानंतर म्हणजे १८ मार्चनंतर आचारसंहिता लागू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

निवडणूक आयुक्तांच्या रिक्त जागा भरणार

निवडणूक आयुक्त अनूप चंद्र पांडे यांनी घेतलेली निवृत्ती आणि निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी अचानक राजीनामा दिल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर देशाच्या निवडणूक आयुक्तांच्या दोन जागा रिक्त झाल्या. या दोन निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती संदर्भात १५ मार्चच्या बैठकीत
**(पान २ वर)**

## अग्नी क्षेपणास्त्र ५ ची यशस्वी चाचणी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवार दि. ११ मार्च रोजी डीआरडीओच्या शास्त्रज्ञांच्या नव्या यशस्वी चाचणीबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. डीआरडीओने मिशन दिव्यास्त्रची यशस्वी चाचणी केली आहे. पंतप्रधान मोदींनी डीआरडीओ शास्त्रज्ञांचे मिशन दिव्यास्त्र या नावाने स्वदेशी बनावटीच्या अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल अभिनंदन केले आहे. डीआरडीओ म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्था. डीआरडीओच्या आणखी




एका यशस्वी चाचणीसाठी शुभेच्छा देत मोदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

पंतप्रधान मोदींनी अधिकृत एक्स मीडिया अकाऊंटवर ट्वीट करत म्हटले आहे की मिशन दिव्यस्त्रासाठी आमच्या डीआरडीओ शास्त्रज्ञांचा अभिमान आहे, मल्टिपल इंडिपेंडेंटली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल तंत्रज्ञानासह स्वदेशी विकसित अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी असे मोदींनी ट्विटर पोस्टमध्ये म्हटले आहे. मिशन दिव्यास्त्र अंतर्गत अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी झाली आहे.या क्षेपणास्त्रामध्ये मल्टीपल इंडिपेंडेंटली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल तंत्रज्ञान आहे. अचूक लक्ष्य भेदण्यासाठी याचा वापर होतो.

## आधीचे मुख्यमंत्री दिल्लीहून हात हालवत परत यायचे : देवेंद्र फडणवीस

मुंबई : कोस्टल रोड प्रकल्पातील वरळी ते मरीन ड्राईव्ह या टप्प्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन पार पडलं. यामुळे प्रवाशांना वरळी ते मरीन ड्राईव्ह हे अंतर अवघ्या दहा मिनिटांत पार करता येणार आहे. या उद्घाटनावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते. यावेळेस देवेंद्र फडणवीसांनी ठाकरे गटावर सडकून टीका केली. तसेच आदित्य ठाकरेंचा उल्लेख उबाठाचे बाळराजे असा करत त्यांना सणसणीत टोला लगावला.

देवेंद्र फडणवीस यांनी आदित्य ठाकरेंवर त्यांचे नाव न घेता टीका केली. ते म्हणाले, मला काल समाजमाध्यमावर बघायला मिळालं की उबाठाचे बाळराजे सांगत होते की कोस्टल रोड आम्ही केला आणि आमच्या कामाचे श्रेय ते घेत आहेत. पहिल्यांदा तर मी त्यांना सांगतो की, आम्ही दुसऱ्यांच्या कामाचे श्रेय घेणारे लोक नाहीत. जे काम आम्ही करतो, त्याचेच श्रेय आम्ही घेतो. या कोस्टल रोडची संकल्पना नवी नव्हती. मला आठवतं उद्धव ठाकरेंनी तर मुंबई महापालिकेच्या दोन निवडणुका या कोस्टल रोडचं प्रेझेंटेशन दाखवूनच पार पाडल्या. कोस्टल रोड मात्र कधी झालाच नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीसांनी केली.

कोस्टल रोडसाठी परवानगी मिळत नव्हती

२००४ ते २०१४ या काळात राज्य आणि केंद्रात यूपीएचं सरकार होतं. कोस्टल रोडची सर्वांत मोठी अडचण ही होती की, आपल्या नियमांत सी लिंक बांधण्यास परवानगी होती. पण कोस्टल रोड बांधण्यास परवानगी नव्हती. कारण कोस्टल रोड तयार करण्यासाठी रेक्लेमशन करावे लागते. रेक्लेमेशन केल्यावर सीआरझेडची लाईन बदलते. म्हणूनच रेक्लेमेशन करू देणार नाही, अशी केंद्राची भूमिका होती, असंही फडणवीस म्हणाले.

आधीचे मुख्यमंत्री दिल्लीहून हात हालवत परत यायचे

पुढे ते म्हणाले, मी याआधी अनेक मुख्यमंत्र्यांना कोस्टल रोडसाठी दिल्लीला जाताना पाहिलं. पण दिल्लीहून ते हात हालवत परत यायचे. केंद्राने त्यांना कोस्टल रोडसाठी परवानगी दिलीच नाही. केंद्रात मोदी आणि राज्यात महायुतीचं सरकार आलं. आम्ही कोस्टल रोड तयार करण्यासाठी परवानगी मिळवण्यास सुरुवात केली. मला आठवतं त्यासाठी केंद्र सरकारसोबत पाच बैठका झाल्या. प्रत्येक अडचणीवर आम्ही पर्याय काढू लागलो. सीआरझेडची लाईन बदलणार नाही, असं आम्ही केंद्राला सांगितलं, अशी माहिती फडणवीसांनी दिली.

कोस्टल रोडच्या या टप्प्यामुळे मुंबईकरांचा प्रवास आणखी सुलभ होणार आहे. येत्या काही दिवसांत हा मार्ग वांद्रे-वरळी सी लिंकला जोडण्यात येणार आहे. त्यामुळे मरीन ड्राईव्ह ते थेट वांद्रे सहज जाणे शक्य होणार आहे.



दैनिक
# यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
मंगळवार दि.१२ मार्च २०२४ ‌ ‌ २
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

**संकल्प आणि कधीही न संपणारा संघर्ष म्हणजे जीवन**

# संत ज्ञानेश्वर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

## स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून भावी कलाकार निर्माण होतात– भाजपाचे प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) संत ज्ञानेश्वर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा झाला. मानवी जीवनामध्ये केलेला असाधारण महत्त्व असल्याचे सांगून कलेमुळे माणूस लोकप्रिय होतो आणि त्याचे खरे संस्कार शालेय व महाविद्यालयातील स्नेहसंमेलनातून होतात म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात अग्रक्रमाने सहभागी व्हावे असे आग्रही प्रतिपादन भाजपाचे प्रदेशाचे प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील यांनी केले.






ते दि. १० रोजी संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना व्यक्त केले.

या समयी उद्घाटक म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख ,विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार बब्रुवाहन खंदाडे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे,भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाच्या सचिव रेखाताई हाके पाटील, भाजपाचे जिल्हा चिटणीस ऍडव्होकेट भारत चामे,भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, ओबीसीचे सरचिटणीस ज्ञानोबा बडगिरे, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. हनुमंत देवकते, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश पुणे, संस्थेचे उपाध्यक्ष एडवोकेट मानसी हाके, कुलदीपभैय्या हाके, शिवलिकाताई हाके, भाजपा प्रदेश सदस्य दत्तात्रय जमालपुरे , प्राचार्य डॉ.वसंत बिराजदार, केंद्रप्रमुख नंदकुमार कोणाले, परमेश्वर पाटील ,सरपंच रमेश कांबळे, भाजपाचे उपाध्यक्ष संतोष कोटलवार, भाजपाचे तालुका सरचिटणीस माणिक नरवटे, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

स्नेहसंमेलनाचा शुभारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत ज्ञानेश्वर माऊली आणि कै.अशोकराव हाके– पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



वार्षिक स्नेहसंमेलन सकाळी दहा वाजता सुरू झालेले तब्बल आठ तास अविश्रांतपणे चालले. यात श्रीराम प्रभू देखावा,



छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, शाहिरी, जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा समाजसुधारकांच्या जीवनावर एकांकिका, नाटिका, भारुड, भावगीत,भक्तीगीत, लोकगीते, लावणी ,हिंदी, मराठी गीते, विडंबन आणि रिमिक्सच्या गीताने रसिकांची मने कलाकारांनी जिंकले.

यावेळी रेखाताई तरडे , गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, दिलीपराव देशमुख यांची मनोगत पर भाषणे झाली.

स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आशा रोडगे–तत्तापूरे यांनी सूत्रसंचालन सतीश साबणे, शारदा तिरुके, यांनी तर आभार मीना तोवर यांनी मानले.

यावेळी माता पालक, पिता पालक, शिक्षण प्रेमी नागरिक आणि रसिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

बहारदार वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मुक्त रंग मोबाईल डायरी चे प्रकाशन



अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) आमदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मुक्त रंग मोबाईल डायरी चे करण्यात आले प्रकाशन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते आज दिनांक ११ मार्च रोजी लातूर जिल्ह्यातील महत्त्वाचे नंबर असलेल्या मुक्त रंग मोबाईल डायरी चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सिध्दी शुगर चे व्यवस्थापके संचालक अविनाश भैया जाधव पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा विश्वभर स्वामी, पत्रकार रामलिंग तत्तापूरे प्रा अनिल चवळे बालाजी तोरणे पाटील, त्रिशरण मोहगावकर, शिवाजीराव गायकवाड,उदय गुंडीले, बालाजी पारेकर, महादेव महाजन,शेख आयुब,अनिल वाडकर, प्रकाश फुलारी,अशिष तोगरे, प्रकाश ससाणे,अशोक सोनकांबळे,रमेश सूरनर आदी सह तालुक्यातील पत्रकार,पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

यावेळी आमदार बाबासाहेब पाटील, यांनी मुक्त रंग मोबाईल डायरी च्या उपक्रम कौतुक केले लातूर जिल्ह्यातील महत्त्वाचे नंबर या मोबाईल डायरी आहेत.मोबाईलच्या युगात आपल्या मोबाईल मध्ये भरपूर नंबर असले तरी अडचणी च्या वेळी आपणास पाहिजे असलेला नबंर आपल्या कडे नसतो तेंव्हा ही डायरी आपल्या मदतीला येते, सर्पमित्र, डॉक्टर, ऑफीस, अधिकारी,असे कितीतरी नंबर यात आहेत डायरी उपयुक्त आहे म्हणून गेल्या२३वर्षापासुन आपले सातत्य त्यांनी टिकून ठेवले आहे त्याबद्दल मी मुक्त रंग प्रकाशनाचे संपादक महारूद्र मंगनाळे पत्रकार दिनकर मद्देवार याचे अभिनंदन करतो त्यांना शुभेच्छा देतो

सुरवातीस कार्यक्रमाचे संयोजक दिनकर मद्देवार यांनी आमदार बाबासाहेब पाटील याचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आमदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ही पत्रकार दिनकर मद्देवार प्रा अनिल चवळे याचा सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामलिंग तत्तापूरे यांनी केले तर आभार रमेश सूरनर यांनी मानले

# नागेंद्र भारती मठात विस लाख रुपयाच्या विकास कामाचे मान्यवरांच्या हस्ते भुमिपुजन

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) नागेंद्र भारती मठात विस लाख रुपयाच्या विकास कामाचे मान्यवरांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अक्कलकोटच्या स्वामी समर्थाचे गुरू नागेंद्र भारती मठात विविध विकास कामाचे भुमिपुजन मान्यवरांच्या हस्ते आज संपन्न झाले. अहमदपूर शहरातील ब्राह्मण गल्ली मध्ये ज्याज्वल्य असलेल्या नागेंद्र भारती मठात अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांनी नागेंद्र भारती यांचे शिष्य म्हणून पाच वर्षे वास्तव्यास होते.

मठाच्या विकास कामासाठी प्रादेशिक पर्यटन विभाग महाराष्ट्र राज्या कडून लोकप्रिय खासदार सुधाकरराव श्रृगारे यांच्या शिफारशी नुसार व भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांच्या पाठपुराव्यामुळे नागेंद्र भारती मठ संस्थानच्या विकास कामासाठी विस लाख चार हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याने आज



दि. ११ मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले. भुमिपुजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, माजी सभापती अशोक काका केंद्रे, माजी नगराध्यक्ष ॲड. भारत चामे, ओबीसी मोर्च्याचे प्रदेश सचिव ज्ञानोबा बडगिरे, भाजपाचे शहराध्यक्ष सुशांत गुणाले,युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष रामानंद मुंडे, युवा कीर्तनकार अविनाश भारती,पोलीस उपनिरीक्षक स्वाती जाधव,पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोलकुमार आंदेलवाड, विस्तार अधिकारी सुळे,कोटगिरे सावकार, माजी उपनगराध्यक्ष अभय मिरकले,परमेश्वर आढाव, महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा पुष्पाताई तेलंग, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा जयश्री केंद्रे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा कल्पना महाजन यांच्या अनेकजण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करण आभार भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी नागेंद्र भारती मठ संस्थानचे मठाधिपती रमेश भारती, ग्यानगिर गिरी, बालाजी गिरी, श्रीधर गिरी, मुरलीधर भारती, सुरेश गिरी, संजय भारती, संजय पुरी, संकेत गिरी, विजय पुरी, शिवा भारती, शिवाजी गिरी, बळी पुरी,हणमंत गिरी, सतिश गिरी, सुरेंद्र गिरी,सुमारे भारती,चंचल भारती,राजेंद्र गिरी, विष्णू पुरी, शंभू देव भारती, काशीगिर गिरी, गोकुळ पुरी, राहुल गिरी, सोनू गिरी, बब्रुवान गिरी, संतोष गिरी यांच्या सह अहमदपूर तालुक्यातील गोसावी समाज बांधवांनी परीश्रम घेतले.

# महात्मा फुले महाविद्यालयाचे महिलांना महिला सन्मान तर पुरूषांना कन्यारत्न पुरस्कार जाहीर



वच्छलाबाई लामतूरे | सौ.अयोध्याताई केंद्रे | सौ.कविता राठोड | सौ.मीनाक्षी शिंगडे | सौ.शारदा भूपाळ | सौ.कमलबाई सूर्यवंशी | कु. साबळे सुप्रिया | शेख साबेरा अली

अहमदपूर दि.११(चापोलीकर) येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून २०२३– २४ या वर्षाचे महिला सन्मान पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा फुले महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने मजागतिक महिला दिनाफ्चे औचित्य साधून विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या महिला शक्तींना महिला सन्मान पुरस्कार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी जाहीर केले. यामध्ये कालकथित सीताबाई गंगाराम ससाणे राज्यस्तरीय नारी शक्ती सन्मान पुरस्कार वत्सलाबाई लामतुरे यांना तर कर्तृत्ववान महिला सन्मान पुरस्कार अहमदपूर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. अयोध्याताई केंद्रे , गुणवंत शिक्षिका पुरस्कार सौ . कविता राठोड , नारी उद्योग रक्त पुरस्कार सौ.मीनाक्षी शिंगडे, क्रीडा रत्न नारी पुरस्कार शारदा भूपाळ ,सरपंच नारी गौरव पुरस्कार कमलबाई सूर्यवंशी, युवती रत्न पुरस्कार कु. सुप्रिया बालाजी साबळे, सिस्टर /दायिनी रत्न पुरस्कार शेख साबेर अली यांना जाहीर करण्यात आला आहे.



डॉ. प्रशांत बिरादार ‌ श्री.अजय मुरमुरे ‌ श्री.चंद्रकांत घूमाळे

### जिजाऊ –सावित्री व कन्यारत्नपुरस्कार

महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापक महिलांना मजिजाऊ – सावित्रीफ सन्मान सौ. प्रा.डॉ. सीमा उप्पलवार, प्रा. कल्पना कदम, प्रा. सौ. प्रतीक्षा मंडोळे यांना देण्यात येणार आहे.

ज्या प्राध्यापकांनी आपल्या दोन मुलींना मुलेच समजलेले आहेत अशा तिघांना मकन्यारत्नफ हा पुरस्कार देण्यात येणार आहे.यात डॉ. प्रशांत बिरादार, अजय मुरमुरे व चंद्रकांत धुमाळे यांचा समावेश आहे.

सदरील पुरस्कारांचे वितरण दि.१५ मार्च २०२४ शुक्रवारी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले महाविद्यालयात होणार आहे.

सदरील कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी तसेच कार्यक्रमाचे संयोजक समाजशास्त्रीय विभागप्रमुख डॉ. सतीश ससाणे प्रा. प्रकाश गायकवाड यांनी केले आहे .

# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



हडोळती दि.११(नागसेन गायकवाड) कर्मयोगी तुळशीराम पवार महविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय , हडोळती येथे जागतिक महिला दिना निमित्त लैंगिक अत्याचार प्रतिबंध विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी बोरोळे तर प्रमूख पाहुणे मा डॉ. रत्नमाला हेंगणे या उपस्थित होत्या. तत्वज्ञान विभाग प्रमुख तथा लैंगिक अत्याचार प्रतिबंध समितीच्या अध्यक्षा डॉ. टेंकाळे सुवर्णा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी महिला दिनाचे महत्व विशद केले. याशिवाय श्रीमती वलसे अलकनंदा या विचारमंचावर उपस्थित होत्या. यावेळी प्रमूख पाहुणे मार्गदर्शन करताना म्हणाले की,महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे . त्याच बरोबर स्वच्छ्ता , आरोग्य , आपला परिवार ङ्क तसेच , आहार व जीवन शैली कशी उत्तम राहिल या विषयी त्यांनी अनमोल मार्गदर्शन केले. तर सूत्रसंचालन पाली विभाग प्रमुख डॉ. गोविंद शिळे यांनी केले,तर आभार हिंदी विभाग प्रमुख डॉ. सादिक शेख यांनी मानले . या कार्यक्रमास कनिष्ठ लिपिक कुलकर्णी धनंजय तसेच यादव अरुण.लाडके बाळू. लुंगारे श्रीराम यांनी परिश्रम घेतले.

सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील विध्यार्थी, विध्यर्थिनी , मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

याशिवाय महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# NEP –२०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाच्या प्रक्रियेबरोबरच कौशल्य विकास व समग्र मूल्यमापन अपेक्षित

## तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या तिसऱ्या अंतिम टप्प्याच्या उद्घाटन कार्यक्रमात कामाक्षी पवार यांचे प्रतिपादन

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) नविन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाच्या प्रक्रियेबरोबरच कौशल्य विकास व समग्र मूल्यमापन अपेक्षित आहे असे प्रतिपादन तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या तिसऱ्या अंतिम टप्प्याच्या उद्घाटन कार्यक्रमात राज्य सुलभक तथा तालुका समन्वयक श्रीमती कामाक्षी पवार यांनी केले.

त्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड आणि गटसाधन केंद्र अहमदपूर यांच्यावतीने घेण्यात येत असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक वृद्धी प्रशिक्षणाच्या तिसऱ्या अंतिम टप्प्याची सुरुवात दिनांक ११ मार्च रोजी डॉ. एस. एस. एम. प्रतिष्ठान अंबाजोगाई रोड अहमदपूर येथे करण्यात आली. यावेळी त्या अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होत्या.




या कार्यक्रमाठी प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ. दिलीप मुगळे हे होते. तर यावेळी व्यासपीठावर डॉ. बालाजी कारामुंगीकर, टेकाळे आर. एस., वाघमारे बी.आर. गाटचेरले पी.व्ही., गुंडरे एस.पी., जवळे डी. आर., इत्यादी सुलभक व गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी राम चामे, सोमनाथ केंद्रे, आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना कामाक्षी पवार म्हणाल्या की, नविन शैक्षणिक धोरण हे राष्ट्राच्या उभारणीत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी महत्वाची भूमिका निभावनार आहे. शिक्षक हे ज्ञानाने समृद्ध असणे काळाची गरज आहे. काळानुसार शिक्षकांना स्वतः मध्ये बदल करून घ्यावा लागेल असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी बोलताना डॉ. मुगळे म्हणाले की, शिक्षक जर विविध कौशल्याने परिपूर्ण असतील तर विद्यार्थीही शिक्षकांचे अनुकरण करुन आपला प्रगतीचा मार्ग अंगिकारतील. सदरील प्रशिक्षण वेळेत, शिस्तबद्ध आणि व्यवस्थित झाले पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुलभक वाघमारे बी. आर यांनी केले. सूत्रसंचलन सुलभक टेकाळे आर. एस. यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुलभक डॉ बालाजी कारामुंगीकर यांनी मानले.

या प्रशिक्षणाच्या तिसऱ्या व अंतिम टप्प्यात जवळपास १४० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

सदरील प्रशिक्षणसाठी गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य समन्वयक, सुलभक, गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी कार्य करत आहेत.

# कबीरवाणी

**कबीर घास न निंदिये ,**
**जो पाऊ तली होय**
**उडी पडे जब आँख मे ,**
**बरी थुहेली होय**

**भावार्थ :** संत कबीर निंदा करणाःयांना उपदेश देतात की, आपल्या पायाखाली असलेल्या गवताचाही कधीच अनादर करू नये. कारण गवताची एक छोटीशी काडी जरी डोळ्यात गेली तरी खूप त्रास होतो. याचा असाही अर्थ निघतो कि एक छोटी काडी पण पर्वताला झाकून टाकू शकते. ढग, सूर्य यांना लपवू शकते. म्हणूनच कुणालाही कमी लेखुन नये, कोणाला लहान समजू नये. प्रत्येक जण आपापल्या योग्य जागी पोचला तर त्याचे महत्व सिद्ध होते. या सृष्टिवर जे काही आहे त्या प्रत्येकाचे महत्त्व आहे.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
मो. ९८२३११२९०७

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना

## रूफ टॉप सोलर बसवा, मोफत वीज मिळवा

### अनुदानाचा लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

लातूर, / प्रतिनिधी: घराच्या छपरावर रूफ टॉप सोलर सिस्टिम बसवून ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळविण्यासाठी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळत आहे. वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले.

मुख्य अभियंता लटपटे म्हणाले की, वीज ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या या योजनेची अंमलबजावणी तातडीने करण्याची सूचना मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला केली आहे.

रूफ टॉप सोलर सिस्टिमसाठी केंद्र सरकारकडून वीज ग्राहकाला एक किलोवॅटसाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी साठ हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळते. वीज ग्राहकांनी कितीही क्षमतेची रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविली तरी जास्तीत जास्त एकूण अनुदान प्रती ग्राहक ७८ हजार रुपये इतके निश्र्चित केलेले आहे. महाराष्ट्रात वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी महावितरण मदत करते. ग्राहकांनी https://pmsuryaghar.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे आहे. पीएम सूर्यघर नावाचे मोबाईल पही यासाठी उपलब्ध आहे. देशभरात एक कोटी घरांसाठी ही योजना सुरू केलेली असून राज्यातील ग्राहकांनी योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्यावा.

एक किलोवॅट क्षमतेच्या रूफ टॉप सोलर सिस्टिममधून दररोज सुमारे चार युनिट अर्थात दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. महिना दीडशे युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या कुटुंबाला दोन किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेची रूफ टॉप सोलर सिस्टिम पुरेशी आहे. दरमहा दीडशे ते तीनशे युनिट वीज वापर असणाऱ्या कुटुंबासाठी दोन ते तीन किलोवॅट क्षमतेची सिस्टिम पुरेशी ठरते. घराच्या छतावर रूफ टॉप सोलर वीजनिर्मिती प्रकल्प बसवून सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करायची, अशी ही योजना आहे. यामध्ये गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यामुळे वीजबिल शून्य येते अर्थात वीज मोफत मिळते व जास्तीची वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते.




नुतन राज्य सभा खासदार डॉ. गोपछेडे लातूरमध्ये लिंगायत समाजाच्या कार्यक्रनिमित्त आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी श्री. नितीन शेटे, श्री. विश्वनाथ निगुडगे, बाबासाहेब कोरे, शिवदास मिटकरी, श्री. गणाचार्य स्वामी, श्री. शिवराज पाटील कौळखेडकर, प्रा. श्री. पानगावे व इतर उपस्थित.

# कवठा केज -भादा रस्त्याचा चाळीस वर्षापासूनचा प्रश्न महायुती शासनाच्या माध्यमातून निकाली :आ. कराड




लातूर - गेल्या अनेक वर्षापासून स्वतःच्या गावचा रस्ता करू शकले नाहीत, केवळ नेत्याचे तुंनतूने वाजवणारे काँग्रेसचे गावचे पुढारी जिल्ह्याचे राजकारण करत आहेत, यांना गावच्या प्रश्नाशी काहीही घेणं देणं नाही असा आरोप करून गेल्या ३५ ते ४० वर्षापासूनचा कवठा केज - भादा रस्त्याचा प्रश्न जनतेच्या मागणीनूसार तातडीने राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून निकाली काढला असल्याचे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे कवठा केज येथील कवठा केज ते भादा रस्त्याचे भूमिपूजन, जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकीचे भूमिपूजन, सिमेंट रस्ता, नाली बांधकाम, जिप शाळा आणि अंगणवाडी दुरुस्ती कामाचे लोकार्पण यासह विविध तब्बल ३ कोटी १५ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमात गावातील महिला पुरुषांनी मोठा सहभाग घेतला होता.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, प्रदेश भाजपाचे सतिश आंबेकर, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, सुधाकर गवळी, गुणवंत करंडे, महादेव मुळे, रविंद्र पाटील, उद्धव काळे, महादेव गुरशेट्टे, सतिश कात्रे, राम पटणे, बालाजी साळुंके, ॲड. धनराज शिंदे, लालासाहेब पाटील, लक्ष्मीकांत घुटे, वाजिद पठाण, कवठा केजचे सरपंच गिरीधर पवार, प्रशांत गोरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपसरपंच अरुण व्हदाडे, युवा धडाडीचे कार्यकर्ते राहुल गोरे यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी आणण्यात यश आले. या निधीतून विकासाची कामे मोठ्या प्रमाणात होत आहेत विकासापासून कोसोदूर असलेल्या कवठा केज गावात वैयक्तिक लाभाच्या योजने बरोबरच सार्वजनिक विकासाला गती मिळाली आहे. केंद्र शासनाचा शक्तीपीठ महामार्ग कवठा केज गावातून जात असल्याने हे गाव विकासाच्या महामार्गावर आले असल्याचे बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण मतदार संघात काँग्रेस आमदारांनी गेल्या पंधरा वर्षात विकासाचा किती निधी आणला, कोणती कामे केली जनतेला जाहीर सांगावे गेल्या तीन वर्षात मी आणलेला निधी त्यांच्याहून निश्चितपणे अधिकच आहे असे सांगून शासनाच्या विविध योजनेची माहिती देऊन गावच्या आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या काळात होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला आशीर्वाद द्यावेत काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडू नये असे आव्हान आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, सरपंच गिरीधर पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामकिशन गोरे यांनी केले यावेळी गोविंद मोहिते, राजसाब गाडे, संजय बनसोडे, व्यंकट रसाळ, रामकिशन गोरे, अविनाश गोरे, शरद मिसाळ, शशिकांत व्हदाडे, गोविंद जाधव, नवनाथ गोरे, शरद बागमोडे, बंडू मस्के, योगेश लुटुरे, अर्जुन लटुरे, गोरख बनसोडे, सुधीर पाटील, श्रीकृष्ण पवार, विश्वजीत घुट्टे, श्रीकांत जाधव, कल्याण घुट्टे, जयराम गोरे यांच्यासह अनेक गावचे सरपंच लोकप्रतिनिधी कवठा केज येथील महिला पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेसची विकासकामे उजळ माथ्याने लोकांपर्यंत घेऊन जावू

लातूर : लोकसभा निवडणुकीत लातूरसाठी काँग्रेस पक्ष जो उमेदवार देईल त्यांना निवडून आणल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसायचे नाही. त्यासाठी घरोघरी जावून काँग्रेसने आज-वर केलेली विकासकामे उजळ माथ्याने लोकांपर्यंत घेऊन जावू. तसा संकल्पच आपण सर्व कार्यकर्त्यांनी करूया, असे आ-वाहन मलातूर ग्रामीणफ्चे आमदार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. धिरज विल-ासराव देशमुख यांनी सोमवारी (ता. ११) येथे केले.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणावर रे-णापूर आणि औसा तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजिण्यात आला होता. यावेळी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व लातूर जिल्ह्याचे लोकसभा निरीक्षक श्री. रामहरी रूपनवर, माजी आमदार श्री. त्र्यंबक भिसे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण जाधव यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मेळाव्याला उपस्थित होते.

आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, मअच्छे दिनफ्वी घो-षणा दिलेल्यांना जनतेने मोठ्या विश्र्वासाने बहुमत देवून सत्तेत बसवले. पण, त्यांनी १० वर्षात काय केले? देशात महागाई, बेरोजगारी, असुरक्षितता वाढवली. आता त्यांच्या भुलथापांना बळी न पडता जुने ते सोने ही म्हण लक्षात ठेवून आपल्याला देशात सोन्याचे दिवस (काँग्रेसचे) आणायचे आहेत. त्यासाठी सर्वांनी अंग झटकून कामाला लागावे. आपापल्या बुथवर बारीक लक्ष ठेवावे. गाफील राहू नये.

लोकशाहीला वाचविण्यासाठी देशाला आज तुमची गरज

भारताचे संविधान बदलण्यासाठी लोकसभा निवडणुकीत भाजपला ४०० पेक्षा अधिक जागा जिंकायच्या आहेत. यासाठीच त्यांचा अट्टाहास सुरु आहे. त्यामुळे निडणुकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे आपण सोने करूया. देशाला घडविण्यासाठी, लोकशाहीला आणि संविधानाला वाचविण्यासाठी देशाला तुम्हा सर्वांची आज गरज आहे. प्रत्येकानी सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी. काँग्रेसला आणि रा-हुल गांधी यांना भक्कमपणे साथ द्यावी, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले. सर्जेराव मोरे, जगदीश बावणे, विजय देशमुख, अनुप शेळके, उमाकांत खलंग्रे, अनंतराव देशमुख, चंद्रचूड चव्हाण, पृथ्वीराज शिरसाठ, रमेश सूर्यवंशी, माणिकराव सोमवंशी, स्वाती सोमाणी, प्रमोद जाधव, शेषराव हाके पाटील, विश्र्वास देशमुख, पाशामियाँ शेख, पूजा इगे, तुकाराम खोले, सुभाष घोडके, हणमंत पवार, बी आचार्य आदी उपस्थित होते. यावेळी रेणापूर गोरसे-नेचे विलास राठोड, सतीश राठोड यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रास्ताविक प्रवीण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन दिनेश नवगिरे, विश्र्वनाथ कागले यांनी केले.

# सिद्धेश्वर यात्रा महोत्सव


## गुरुबाबा महाराज यांचे आज चक्रीभजन

लातूर/प्रतिनिधी: ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून मंगळवार दि.१२ मार्च रोजी गुरुवर्य हभप गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन संपन्न होणार आहे.



यात्रा महोत्सवानिमित्त शुक्रवार दि.८ मार्च पासून विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत.शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्रींची महापूजा व झेंडावंदन झाल्यानंतर महोत्सवास सुरुवात झाली. महाशिवरात्रीपासून आजपर्यंत हजारो भक्तांनी श्री सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले.महोत्सवाच्या कालावधीत रात्रीच्या वेळी आयोजित करण्यात आलेल्या कीर्तनासही भक्त हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत आहेत. गुरुबाबा महाराज औसेकर हे चक्रीभजनासाठी राज्यात प्रसिद्ध आहेत.अतिशय तल्लीन होऊन महाराज चक्रीभजन करतात.या चक्रीभजनात सहभागी होण्याची,हे भजन पाहण्याची व ऐकण्याची असंख्य भक्तांची इच्छा असते.हे लक्षात घेऊन देवस्थानच्या वतीने यावर्षी गुरुबाबा महाराजांचे चक्रीभजन आयोजित केले आहे.

मंगळवारी सायंकाळी ६ ते ८ या कालावधीत देवालयाच्या परिसरात हे चक्रीभजन संपन्न होणार आहे.लातूर व परिसरातील भक्तांनी या चक्रीभजनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन देवस्थान समितीचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह ज्येष्ठ यांच्यासह विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## संपादकीय

# कधीही न संपणारा प्रश्न-उत्तरे यांचा सिलसिला

मेरे सवालों का जवाब दो, ना अनेक प्रश्नार्थक आर्जवाने सुरू होणारा रोमांचकारी प्रवास, त्यातून मिळणाऱ्या उत्तराची ओढ तितकीच हवीहवीशी गोड. अनेक काळापासून वेगवेगळ्या क्षेत्रांत, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रश्न-उत्तरे यांचा सिलसिला कायमच सुरू झाला. कुतूहल व त्यातून निर्माण होणारे प्रश्न आणि त्यांच्या उत्तरांचा घेतलेला शोध, त्यातून मिळालेली उत्तरे. गर्भवतीच्या डोहाळ जेवणावेळी काय अपत्य होणार? यावर तिची केली जाणारी गोड चेष्टा.

आपला अनादी-काळापासूनचा प्रवास हा आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर आलेल्या प्रश्नार्थक कुतूहलातून उत्तरांच्या शोधाकडे होत असतो, यातून निर्माण झालेले अनेक क्षेत्रांतील शोध, विज्ञान, आरोग्य, अवकाश, समुद्र, संगीत, शिक्षण यांसारख्या अनेक क्षेत्रांतील प्रगती थक्क करणारी आहे. झाडावरून फळ खालीच का पडते? या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधातून विज्ञानाचा शोध लागला. आजवर मागे वळून पाहताना आपल्याला पडलेले अनेक प्रश्न व त्यांच्या उत्तरातून झालेला नावीन्याचा शोध खरेच विस्मयकारक.

वैद्यकीय क्षेत्रांतील विविध प्रश्न, त्यांची उत्तरे, त्यांचे निराकरण व उपाययोजना शोधण्यासाठी निरनिराळ्या औषध योजना अनेकविधयंत्र, त्यांचा आपल्या आरोग्यासाठी झालेला उपयोग याची उपयोगिता आपण सर्वचजण अनुभवत आहोत. कायदा क्षेत्रातील खटल्यादरम्यानचे प्रश्न, त्यावर मिळणाऱ्या उत्तरांमधून कितीतरी समस्या, घटनांची सत्यता पुढे येते. लीडिंग प्रश्न (ङशरवळपस टींशींळेप) हा नेहमीच ऐकण्यातील शब्द कारण त्यातच मिळणाऱ्या उत्तराची खात्री असते. काही प्रश्न कायम गूढ बनून राहतात. प्रश्नार्थक नजर' कायम उत्तरे मिळू शकणाऱ्या नजरेचा' वेध घेते.

शालेय जीवनातील परीक्षेला पालकांनी पहाटे उठवून घेतलेली प्रश्न-उत्तरांची उजळणी आणि प्रत्यक्ष परीक्षेला त्याची झालेली आठवण परीक्षेचा पेपर सोपा गेला की अवघड गेला? हा परत पडणारा प्रश्न आणि त्याचे उत्तर परीक्षेचा रिझल्ट लागल्यावर मिळणार असते. वर्गात मागे-पुढे बसलेल्या आपल्या वर्गमित्र परिवाराला खाणा-खुणा करून विचारलेले प्रश्न आणि सर्व शिक्षकांच्या नजरेच्या आडून दिलेली उत्तरे हे सर्व आठवले तरी गंमत वाटते आणि आता महत्त्वाच्या परीक्षांच्या प्रश्नांच्या पेपरफुटीचे प्रकरण.

रोमांचकारी नात्यामध्ये प्रश्न नजेतून उत्तर पण नजरेतून जणू शब्दांची गरज नसावी.

कुछ सवालों के जवाब सवाल' नही होते।

कधी काळी ऐकलेला हा संवाद.

राजकपूर व नर्गिसजी यांच्यावर चित्रित झालेल्या इचक दाना, बिचक दाना, दाने उपर दाना! यातून अल्लडपणे विचारली जाणारी प्रश्नार्थक कोडी, त्यातून बुद्धीला चालना मिळून मिळणारी गंमतीशीर उत्तरे.

मराठी चित्रपटांमधून पूर्वी लावणी' या लोकप्रिय व संस्कृतीप्रधान कलाप्रकारामध्ये सवाल-जवाब हा मनोरंजक कार्यक्रम असायचा. दोन प्रतिस्पर्धी लावणी संघांमध्ये समोरा-समोर, आमने-सामने होऊन अतिशय कलात्मकदृष्ट्या अवघड प्रश्न-कोडी गीताच्या माध्यमातून एकमेकांना विचारली जात. यात प्रश्न (सवाल) विचारणारा व उत्तर (जवाब) देणारा यांचे कौशल्य पणाला लागायचे, प्रतिष्ठेची चुरस असायची. ऐका असे ठसक्यात म्हणत सुरुवात असायची.

अनेक नावाजलेले, कसलेले कलावंत हा ठेवा जिवंत करून ठेवत. कधी चांगले अनुभव येतात, तर कधी वाईट अनुभव. तेव्हा असे का घडले? कोण? कसे? का वागले आपल्यासोबत हा कायम सतावणारा प्रश्न. हवाई अपघात, विमान अपघातामध्ये त्या संदर्भात असणाऱ्या किती तरी प्रश्नांची उत्तरे त्या घटनेचा (इश्ररलज्ञ ड्ढ) ब्लॅक बॉक्स सापडल्यावर मिळणार असतात. सागरी अपघातामध्ये एखाद्या जहाजाला जलसमाधी, अग्निप्रकोप घडल्यावर अनेक नवीन प्रश्न, नवीन कारणे यांचा शोध.

कधी, कधी वाटते काय उपयोग ते मिळून झालेले नुकसान, मनुष्यहानी कधी भरून निघणार आहे का? अगदी कटप्पाने बाहुबलीला का मारले? या प्रश्नाच्या उत्तरादाखल या चित्रपटाचा नवीन भाग पाहण्याच्या विनंतीवजा प्रेमळ सूचनेतही प्रश्नच. राजकीय कार्यकाळामध्ये राखून ठेवलेला प्रश्नोत्तरा'चा तास. एखाद्या जीवाचा अचानक संपलेला जीवनप्रवास अनेक प्रश्नांना जन्म देऊन जातो. का झाले? कसे झाले? अविश्वसनीय असे प्रश्न. अनेक प्रकारची प्रश्न-मंजूषा व त्यांच्या अनेक स्पर्धा. हॉट-सीटवरच्या स्पर्धकाला अनेक प्रश्नांच्या अडथळ्याची शर्यत पार करून करोडपती बनवण्याची संधी देणारी प्रश्नमंजूषा' स्पर्धा. लॉक किया जाय? खात्रीचे उत्तर मिळण्यासाठी विचारलेला प्रश्न. अनेक नोकरीच्या ठिकाणी मुलाखतीमध्ये विचारले जाणारे आव्हानात्मक प्रश्न, त्यांची अनेक वेळा केलेली रंगीत तालीम.


लहानपणी दारी येणाऱ्या भोलानाथ'ला विचारले जाई सांग, सांग भोलानाथ पाऊस पडेल का? शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल का? आणि आता सांग, सांग भोलानाथ, महामारी संपून परत शाळा सुरू होईल का? या उत्तर द्यायला भोलानाथही नाही. नुकतीच अनाथांची माय दूरच्या प्रवासाला मार्गस्थ झाली, त्या माऊलीला कायम एकच प्रश्न भेडसावत असे अनेक अनाथ लेकरे, मुक्या गाई यांची पोटा-पाण्याची तहान-भूक कशी मिटेल?

अत्यंत टोकाची हिंसा, अत्याचार पाहण्यास अनुभवास येतो, अनेक नाती संपवली जातात किंवा एवढे क्रूर कोणी का वागू शकतो? असाच प्रश्न पडतो. भर राजसभेत अपमानीत स्त्रीने, संपूर्ण राजसभेला अत्यंत विषादाने, दु:खी अंतःकरणाने विचारलेले अनेक प्रश्न वर्षानुवर्षे आपल्या नजरेसमोर असतात. युद्धभूमीवर पार्थाला पडलेला प्रश्न व त्यातून निर्माण झालेली संभ्रमावस्था आणि ती दूर करण्यासाठी साक्षात भगवंताने उत्तरादाखल केलेली श्रीमद्भगवतगीतेची रचना, अतिशय सुंदर निराकारण. अजूनही कायम नवे-जुने प्रश्न निर्माण होत राहणार, वेगवेगळ्या टप्प्यांवर आयुष्य जगताना आणि त्यांची उत्तरे व त्यातील नवे शोध-बोध' कधीही न संपणारे

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

# जोसिआ वेजवुड ४३



कुंभारकामाचा वैज्ञानिक पद्धतीने उत्कर्ष साधणारा व मातीच्या भांड्यांना झिलई देण्याची पद्धती शोधणारा जोसिआ वेजवुड याचा जन्म लंडन शहरात इ.स. १७३० मध्ये झाला. त्याचा मोठा भाऊ थॉमस, त्याला शिकवून खूप मोठे करावे असे वडिलांना वाटे पण कुंभारकामाचा वाढता पसारा, व्यापाऱ्यांची ये-जा, कारखान्यातील कामांचे ढीग यात सारे कुटुंब गढून जात असे. थॉमसही कारखान्यातील कामे उरकण्यात दंग झाला.

जोसिआचा जन्म झाल्यावर त्याला तरी शिक्षणाचे वाण मिळावे म्हणून वडिलांनी त्याला शाळेत घातले, पण जोसिआला ते पुस्तक-वह्यांचे ढीग, पाठांतर, तीच तीच प्रश्नोत्तरे यांचा वीट आला. तो म्हणाला, 'मला स्वतंत्र बुद्धीने काही तरी करून दाखवायचे आहे. थॉमसदादाबरोबरच मलाही आपल्या काखान्यात काम करायचे आहे!' आणि शिक्षणाच्या नादी न लागता अनुभवजन्य कृतिशील शिक्षणाच्या कुंभारकलेत तो व्यस्त राहू लागला.

जोसिआ चाकावर बसून नवीन घाटाची, गि-हाईकांच्या पसंतीची भांडी बनवू लागला. घडलेली, सुकलेली मडकी, माठ, तवे आव्यात ठेवून तो मूठभर पांढरी पावडर त्यावर टाकायचा त्यामुळे भांड्यांना छानदार झिलई यायची. मग काय विचारता? नवीन घाट व नवीन झिलईच्या भांड्यामुळे खूप मागणी बाढली. बेजवुड भांडी सर्वांच्या तोंडी झाली. त्याकाळी कुंभारकाम आणि रसायनशास्त्राचा तसा फारसा संबंध कोणालाच ज्ञात नव्हता. मात्र तसा संबंध असला पाहिजे असे जोसिआला सतत वाटे.

कुठलेही नवीन प्रयोग सुरू करण्याआधी शिस्त व स्वच्छता या धंद्यात आणून कामगारांना योग्य प्रशिक्षण द्यायला हवे असे जोसिआला वाटे. कामगारांच्या कृतीतील ओबडधोबडपणा घालवून कलात्मक वस्तू बनवून घेण्यात त्याने रस घेतला. प्रयत्नात कसूर न करता अपयशाशी झगडत त्याने नवीन भट्ट्यांच्या रचना करून, सुधारून पाहिल्या. मध्येच देवीच्या आजारात तीव्र वेदनांसहित त्याच्या उजव्या पायाचे दुखणे उभे ठाकले. असहाय स्थितीत सहा महिने तो अंथरूणास खिळला. आता त्याच्या नवीन भांड्याचे उत्पादन थांबून धंद्यात त्याला खोट बसू लागली, अखेर वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी पाय कापण्याची शस्त्रक्रिया झाल्यावर तो बरा झाला खरा, पण दुःखाच्या क्षणांनी तो अधिक विचारवंत व अंतर्मुख बनला.

कुंभारकाम कला की शास्त्र ? तसेच कुंभारकलेचे वैज्ञानिक नियम, निष्काळजीपणाचे दुष्परिणाम बाबर जोसिआने खूप विचार केला. चिकणमातीचे भौतिक, रासायनिक गुणधर्म लक्षात घेऊन एक नवीन संशोधन प्रयोगशाळा त्याने आपल्या कारखान्यात चालू केली. भांड्यांची झिलई, टिकाऊपणा, नक्षीकाम या घटकांबरोबरच आच्यातील रासायनिक प्रक्रियांचा त्याने अभ्यास करून नवीन भट्ट्या उभारल्या. सतत प्रयत्न, पायाशुद्ध विचारसरणी काटेकोरपणा, नावीन्याचा ध्यास यामुळे जोसिआच्या मालाचा इंग्लंड, युरोप, अमेरिका देशात अमाप उठाव झाला. इंग्लंडच्या कैरोलीन राणीने त्याला 'राजमान्य कलाकार' म्हणून नेमणूक दिली. त्यामुळे वेजवुड भांडी ही 'राणीची भांडी' म्हणून ओळखली जाऊ लागली. अशा रीतीने आपल्या उद्योगाला कलात्मक निर्मितीची प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा जोसिआ बेजवुड १७९५ मध्ये निवर्तला.

# मुखवट्यामागचे चेहरे

अवतीभोवती : संदीप वाकचौरे

जीवन अधिकाधिक सुखावह आणि समृध्द करण्यासाठी माणूस धडपड करत आहे. जीवन सुखमय करण्यासाठी माणसे नवनवीन वस्तूची निर्मिती करत आला आहे. या प्रगतीतच युध्दाचा मार्गही अनुसरला आहे. स्पर्धा होतीच. आजही आहे; पण स्पर्धेचे स्वरूप फक्त जी-वघेणे बनत चालले आहे. माणसे अधिक व्देषमूलक बनत चालली आहे. माणसातील सहकार्याचा भावही हरवत चालला आहे. आपण प्रगतीचे पंख लावून भरारी मारताना बरेच काही गमावत आहोत. खरेतर जे गमावणे गरजेचे होते ते काही गमावणे झाले नाही. जात, पात, धर्माचे कर्मकांड, परंपरा, कुप्रथा यांना निरोप देण्याची गरज होती; पण शिकल्यानंतर आणि प्रगती केल्यानंतरही गमावणे न होता त्यातील खोटाभाव अधिक दृढ होत चालला आहे. प्रगतीने माणसांची नाती सैल झाली आणि विचार अधिक द्वेषमूलक व प्रेम देखाव्याच्या स्वरूपात व्यक्त होऊ लागले आहे. माणसे अंतरिक जिव्हाळ्याने एकत्र येण्याची गरज असताना केवळ नाटक करत जिव्हाळा व्यक्त होऊ लागला आहे. माणसांचे चेहरे अधिक सुंदर बनण्याऐवजी ते अधिक मुखवट्याची बनत चालली आहे. मुखवटे हे नेहमीच खोटे आणि फसवे असतात. आज आपला भोवताल मुखवट्यांनी सजलेला आहे. म्हणून तो अधिक फसवा बनत चालला आहे. भोवताल जेव्हा फसवा असतो तेव्हा माणसांचे चेहरे अधिक भेसून आणि विदारक असतात. या मुखवट्यामुळे माणसे सत्यापासून आपोआप दूर जात आहेत.

आपण जितकी प्रगती करत आलो त्यातून आपल्याला खरचं सुख, समाधान मिळाले आहे का? माणसाचे जगणे अधिक सुंदर झाले का? माणूस जन्माला आला असेल तेव्हा त्याच्या असलेल्या गरजा आणि वर्तमानातील माणसांच्या गरजा यांच्यात आता कितीतरी अंतर पडले आहे. भूतकाळातील माणसे अधिक सुखी होती का? तर त्या पिढीशी संवाद साधताना त्यांची उत्तरे नेहमीच हो' येतात. परवा पंच्याहत्तरी पार केलेल्या एक वयोवृध्दाशी संवाद झाला. ते म्हणत होते की, आमचा काळ अत्यंत आनंदाने भरलेला होता. त्या काळात कदाचित पोटभर भाकर नसेल; पण माणसे वाटून खात होती. माणसे माणसात होती आणि घर घरात होते. घरात माणसे होती. माणसांनी गोकूळ भरलेले वाटावे असे चित्र असायचे. माणसे एकमेकाच्या सुखात धाऊन जायची तसे दुखातही असायची. येथे प्रत्येक वेळी सक्रियता असायची आणि ती पण हृदयापासूनच. माणसे भूकलेली होती; पण आनंदाने तृप्त होती. माणसांच्या जीवनात अखंड जीवनभर उणिवा होत्या; पण जीवन मात्र आनंदाने भरलेले असायचे.



वर्तमानात आपल्याकडे काय नाही..? असा प्रश्न विचारला तर माणसे पूर्वीपेक्षा अधिक सुखी आहेत. विचार केला तर आपण भूतकाळापेक्षा कितीतरी संपन्न आहोत. घरात भौतिक सुखांची रेलचेल आहे. पूर्वी पैसे नाही म्हणून अनवाणी पायाने चालणारी माणसे होती. कधी तरी झाडाचा पाला पायाला बांधून प्रवास करत होती. आज बुट, चप्पल, सँडल आणि त्यातीलही विविध प्रकारच्या वस्तू घरात आहेत. माणसे कमी आणि भौतिक सुविधा अधिक. घरात पूर्वी पाटा वरवंटा होता, चूल होती, कामाचे कष्ट होते. आज त्यावर मात करणारी व्यवस्था उभी राहिली आहे; पण पूर्वी त्या निमित्ताने माणसे एकत्र असायची. एकमेकाला मदतीचा हात असायचा आणि घरात लोक एकत्र भोजन करायची. त्या एकत्रित बसण्यालाही आनंद होता आणि जगण्याला सुगंध होता. माणसे एकत्रित होती आणि त्यांचे विचारही. आज बरोबर असले तरी माणसे संगत बदलतात. नाती बदलली जात आहेत. माणसाची नातीही विरळ होत चालली आहे. देणे आणि घेणे एवढ्यापुरता विचार नात्यात घर करून राहिला आहे. आज विचाराची वाट नाही आणि जीवनात आनंदाचे क्षण नाही, असे वाटू लागले आहे. माणसाचे माणूसपण हरवले आहे. त्यातील गोडवाही. माणसे समोर आली की, हसता आणि वेळ मारून नेतात; पण हे हसणे खरच विकट असावे असा भास होत जातो. खऱ्या हास्यात आनंद असतो आणि प्रेमाचा ओलावाही; पण या हास्यात फक्त स्वार्थाचा दुर्गंध असतो.

माणसे आज एकमेकांकडे जाण्यासाठी वेगवान वाहने वापरत आहेत. पूर्वी पायी चालणारी माणसे होती. ती अनेक किलोमीटर पायपीट करायची. कधी तरी श्रीमंतीचे लक्षण असलेली माणसे बैलगाडी वापरायचे; पण पायी असूनही माणसांच्या हृदयी प्रेमाचा ओलावा होता. माणसे उन्हात होती; पण प्रेमाचा गारवा अंतकरणात ठासून भरलेला होता. माणसे आज सावलीत आहेत; पण गारवा आटला आहे. जशा भौतिक सुविधांनी आपल्या घरात स्थान मिळवले त्या प्रमाणात आपल्या जीवनातील आनंदाला पारखे होत चाललो आहोत. अनवाणी पायी चालणारी माणसे आपला भोवताल जाणत होती. उघड्या डोळ्यांनी निसर्गाचा आनंद अनुभवत होती. पहाटे पहाटे शेतीच्या कामाला जाताना झाडावरील पक्षांचे गुंजन ऐकत होती. झाडे वेलीच्या पानावरील दवबिंदूही त्यांच्या अंतकरणात प्रेमाचा ओलावा निर्माण करत होती. त्या दृष्टीने त्यांची हृदये निर्मळ होती. म्हणून त्यांना तो इतरवेळी सहजतेने ऐकू न येणारा आवाज त्यांना ऐकू येत होता. माणसांची हृदय तितकीच अंतकरणात प्रेमाने ओथंबून वाहत होती. प्रेमाचे नाते असल्याने उणिवा, उणे दुणे फारसे नव्हतेच. माणसे परिस्थितीने फाटकी होती; पण नात्यात नेटकी होती. द्वेष, मत्सराचा स्पर्श झालेला नव्हता. जिथे माणसे माणसांवर ओथंबून प्रेम करत होती, तिथे भूतदयेचा विचारही मनामनात घर करून होता.आपण भौतिक सुविधांनी संपन्न झालो आहोत. आज राहण्यासाठी बंगला आहे. घरासमोर वाहने आहेत. संवादासाठी मोबाईल आहेत, घरात फ्रीज, पंखा, कुलर आहे. माणसे कामाला आहेत; पण संवादाची भूक हरवली आहे आणि नजरेत सौंदर्याचा अभाव आहे. माणसे भेटत आहेत; पण भेटीतील ओलावा नाही. पदाला प्रतिष्ठा आहे; पण आत्म्याची प्रतिष्ठा हरवली आहे. माणसे सुखाच्या शोधात भटकत आहेत; पण वाटा चुकल्या आहेत. आपण निसर्गावर मात करत सारे काही मिळवण्याचा प्रयत्न करत आहोत; मात्र आपल्या अतिरेकी हावेमुळे निसर्गाला ओरबाडले जात आहेत. त्यामुळे त्याच्या डोळ्यात पाणी आहे. तो आपली भूक भागवेल; पण हाव कशी भागवणार? आपला आनंद निसर्गावर मात करण्यातील आहे. त्याला नष्ट करताना प्रगती होत आहे ही प्रगती म्हणजे आपला आभास आहे. त्यामुळे निसर्गही आपल्यावर आनंदाची छायेची पाखरण नाही करू शकणार. त्याच्यासोबत जगला तर हृदये प्रेमाने ओथंबून वाहतील. हास्यातील लावण्यही अधोरेखित होईल. जीवनातील आनंद खळखळ वाहता होईल; पण त्यासाठी निसर्गाचे हात घ्यायला हवे; अन्यथा घेणारे हातच आपला घात करतील.

## भारतात लठ्ठपणाचे प्रमाण वाढले



भारतातील स्त्री-पुरुषांमध्ये गेल्या तीन दशकांत लठ्ठपणा झपाट्याने वाढला आहे. स्त्रियांमध्ये लठ्ठपणा आठ पटीने तर पुरुषांमध्ये ११ पटीने वाढला आहे. महिलांमधील लठ्ठपणाचे प्रमाण १९९० मधील १.२ टक्क्यांवरून २०२२ मध्ये ९.८ टक्क्यांपर्यंत आणि पुरुषांमध्ये ०.५ टक्क्यांवरून ५.४ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. तर महिलांमध्ये कमी वजनाचे प्रमाण १९९० मध्ये ४१.७ टक्क्यांवरून २०२२ मध्ये १३.७ टक्क्यांवर तर पुरुषांमध्ये ते ३९.८ टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांवर आले.अहवालानुसार, भारतातील मुलींमधील लठ्ठपणाचे प्रमाण १९९० मधील ०.१ टक्क्यांवरून २०२२ मध्ये ३.१ टक्क्यांपर्यंत वाढले आहे आणि मुलांमध्ये ते ०.१ टक्क्यांवरून ३.९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. २०२२ मध्ये मुली आणि मुलांमधील लठ्ठपणामध्ये भारत जगात १७४ व्या क्रमांकावर होता. २०२२ मध्ये लठ्ठपणाने त्रस्त महिला आणि पुरुषांची संख्या ५०४ दशलक्ष आणि ३७४ दशलक्ष होती. १९९० च्या तुलनेत त्यात ३७७ दशलक्ष आणि ३०७ दशलक्षने वाढ झाली. २०२२ मध्ये लठ्ठ प्रौढांची सर्वाधिक संख्या असलेले देश म्हणजे अमेरिका, चीन आणि भारत. लॅन्सेटमधील अहवालाने हे देखील उघड केले आहे की, भारतातील ३० दशलक्ष प्रौढ एकतर जास्त वजन किंवा लठ्ठ आहेत आणि ६२ दशलक्ष मधुमेही भारतीय लठ्ठपणाशी संबंधित आजाराने ग्रस्त आहेत. चिंतेची बाब म्हणजे मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढण्याचा जागतिक कल. दहापैकी तीन शाळकरी मुले लठ्ठ आहेत, हे भारतातील वाढत्या लठ्ठपणाचे प्रमाण दर्शवते. कोरोना साथी नंतर त्यात वाढ झाली आहे.

## राशी भविष्य



१२ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर
व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

मिथुन: शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम
कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

कर्क :शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

सिंह : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण
जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

कन्या : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

तुळ : शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा :पश्चिम
आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

वृश्चिक:शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

धनु: शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम
संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

मकर: शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर
लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

कुंभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

मीन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण
नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

११ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, चंद्र व नेपच्यूनचा प्रभाव आहे. सार्वजनिक जीवनाची तुम्हाला आवड आहे. समाजात काही मुल्ये प्रतिष्ठित व्हावीत म्हणून तुम्ही सतत प्रयत्न करता. भ्रष्टाचाराची तुम्हाला विलक्षण चीड आहे. शारीरिक पातळीवर तुमचा उत्साह उदंड असतो. न थकता तुम्ही बराच काळ काम करू शकता. पण तुमच्या हळव्या वृत्तीमुळे छोटेसे अपयश आले तरी त्याचा तुम्ही बाऊ करून घेता. लोकांची दु:खे जाणून घेण्यात व ती दूर करण्यात तुम्ही स्वत:ला धन्य समजता. निसर्ग सहवासाची, जलाशयाची तुम्हाला ओढ असते. जीवनातील गूढ गोष्टींबद्दल आकर्षण असते.

दिवास्वप्नात वा मनोराज्यात रमण्यामुळे तुम्ही वास्तवापासून दूर जाता. अपयशाने खचून न जाता मनोबल कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. आपल्या समस्या मोकळेपणाने लोकांपुढे मांडा. नैराश्य, उदासीनता यांचा पगडा बसून व्यसनांच्या आहारी जाण्याचा धोका आहे. प्राणायाम, ध्यानधारणा याबाबत मार्गदर्शन घ्या.

कार्यक्षेत्र :तुमची प्रवृत्ती नाजूक असल्याने जास्तकष्टाची कामे तुम्हाला झेपणारी नाहीत. आपली कल्पकता व सर्जनशीलता यांना वाव मिळेल असे कलाक्षेत्र निवडा. तुमच्या जीवनात आास्थिरता निर्माण होण्याची, गावोगावी बदल्या होण्याची शक्यता बरीच असते. मनोविकार तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, कुटुंबकल्याण सल्लागार हे व्यवसाय उत्कर्षकारक आहेत. पर्यटन, औषधी वनस्पती, दूध डेअरी वगैरे व्यवसायातही तुम्ही प्रगती करून घेऊ शकाल.

प्रणयी जीवन : आपल्या प्रेमाची उतावीळपणे अभिव्यक्ती करण्याचे टाळा. तुमचे मूड सतत बदलत असल्याने इतरांना तुमच्याशी जमवून घेणे जड जाते. प्रियकराने आपल्या संवेदनशील मनाची कदर करावी आपल्या भावना जपाव्यात अशी तुमची अपेक्षा असते. या दृष्टीने फेब्रुवारी १९ ते मार्च २० मधील किंवा एप्रिल २१ ते मे २० दरम्यानचा जोडीदार अनुरूप ठरेल. जन्म तारखा ७, १६, २५ अधिक उत्तम.

वर्षफळ : जुने संबंध जोपासा नवे प्रस्थापित करा. कारण जनसंपर्क आगामी वर्षात महत्वाची भूमिका बजावणार आहे. फेब्रुवारी मार्च मध्ये व्यवसायाला मनासारखा आकार देण्याची महत्वाकांक्षा पूर्ण होईल. एप्रिल मे मध्ये उत्कर्षाच्या नव्या योजनांची आखणी होईल. नोकरीत पगारवाढ, महत्वाच्या स्थानावर नेमणूक संभवते. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये देवघेवीचे व्यवहार पूर्ण होतील. नोव्हेंबर मध्ये स्वत:ची जागा घेऊ शकाल.

महत्वाचे वर्ष : २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५, ७४.

भाग्यरत्न : मोती

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# महाशिवरात्री यात्रेनिमित्त श्री सिद्धेश्वरास गंगेच्या पाण्याचा अभिषेक



लातूर :- येथील श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर हे जागृत देवस्थान म्हणून खुप प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त भव्य दिव्य यात्रा महोत्सव असतो. यात्रा महोत्सव कार्यकाळातील अमावास्येचे औचित्य साधत अभिषेक करण्याचा मान लातूर येथील वीरशैव तेली समाज यांना मिळाला. समाजातील महिलांनी प्रथेनुसार गंगेच्या पाण्याचा कळस डोक्यावर घेऊन श्री सिद्धेश्वर मंदिर येथे आले. यावेळी समाजातील बांधव श्री मालिकार्जुन कलशेट्टी ,श्री.विजय फेसगाळे ,श्री.राहुल बंगले ,श्री.गणेश होकळे ,श्री.वैभव क्षीरसागर यांच्या हस्ते सिद्धेश्वरास गंगेतील पाण्याने अभिषेक करण्यात आला.

तसेच कु.विराज विकास देशमाने व कु.नेहा रामेश्वर देशमाने यांनी शंकर पार्वती यांची वेशभूषा साकारून यात्रेतील उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी माहेश्वरी महिला समाज भजनी मंडळ यांनी वाजत गाजत मानाच्या काठीची मिरवणूक काढत मंदिरात जाऊन अमावस्येचा दिवस साजरा केला.

यात्रा संयोजक अशोक भोसले यांनी मानाच्या काठीचे स्वागत केले. याप्रसंगी वीरशैव तेली समाज आणि जिल्हा तेली समाज सेवाभावी संस्था अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, युवक,महिला माता-भगिनी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंद मुलींच्या वसतिगृहात जागतिक महिला दिन साजरा

## डॉ.पदमावती बियाणी तोष्णीवाल यांचे मार्गदर्शन

लातूर / प्रतिनिधी- दयानंद शिक्षण संस्था संचलित , दयानंद मुलींच्या वसतिगृहात दिनांक. ७ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. पदमावती बियाणी तोष्णीवाल यांचे मार्गदर्शनपर व्याखानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य.डॉ.क्रांती सातपुते या होत्या.प्रा.मेघा पंडीत ,प्रा. डॉ.मनिषा आष्टेकर व प्रा.डॉ. सुनिता सांगोले यांची प्रमुख उपस्थिलती होती.

प्रमुख मार्गदर्शक मा.डॉ.पदमावती बियाणी तोष्णीवाल या होत्या.. याप्रसंगी डॉ.पदमावती बियाणी तोष्णीवाल यांनी आपल्या मार्गदर्शनात असे सांगितले की , आपल्या ध्येयाकडे नेहमी केंद्रीत असले पाहिजे त्या ध्येयासाठी कष्टांची पराकाष्ठा करावी तेंव्हाच यश संपादन होईल .आपली संस्कृती जोपासत आपल्या घराला ,समाजाला देशाला सोबत



घेवुन चालणे म्हणजेच महिला सक्षमीकरण आहे. तसेच त्यांनी आपल्या मार्गदर्शनात आजच्या जीवनातील स्त्री कशी असायला हवी, आयुष्यात प्रत्येक स्त्रीने रोजच्या दिवशी समतोल कसा साधला पाहिजे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यासोबतच विदयार्थिनीनी आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यायला पाहिजे तसेच निमिया ,HPV vaccine ,संदर्भातील सखोल माहिती यासोबतच योग्य आहाराचे सेवन, व्यायाम याबाबत मार्गदर्शन केले. अनेक विदयार्थिहनींनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसनही त्यांनी केले. जागतिक महिना दिनाचे औचित्य साधून वसतिगृहातील सर्व महिला कर्मचा-यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.तसेच काही स्पर्धेतील विदयार्थिहनींचे पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.मनिषा आष्टेकर यांनी केले. प्रास्ताविक देताना त्यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व पटवुन सांगितले. यामध्ये स्त्री पुरुष समानतेबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच स्वत:वर प्रेम करा , स्वत:चे छंद जोपासा , स्वत:चे अस्तित्व ओळखा , स्वावलंबी बना तसेच त्यांनी एका सुंदर कवितेतुन महिलांचे ख-या अर्थाने आजची महिला कशी असायला हवी हे पटवुन दिले.

प्रा.डॉ. सुनिता सांगोले यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. मनोगतामध्ये त्यांनी विदयार्थिनींना स्वत:च्या क्षमता ओळखायला शिका , आत्मविश्वास बाळगुन पुढील वाटचाल करा व स्वत:ला सिदध करण्याचा प्रयत्न करा व त्यातुनच यश संपादन करा असा संदेश त्यांनी आपल्या मनोगतातून दिला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य.डॉ.क्रांती सातपुते यांनी विदयार्थियनींना जगण्याचे तीन मंत्र सांगितले ते म्हणजे आपल्या गुणांना सजवायला शिका, मोबाईलपासून दूर रहा, आपल्या यशामुळे आई वडिलांच्या चेह-यावर आनंद देण्याचा प्रयत्न करा. भारतीय स्त्री ही कोणत्याही क्षेत्रात मागे नाही कारण स्त्री ही देवाची सर्वात शक्तीशाली व सुंदर निर्मिती आहे. तसेच प्रत्येक स्त्रीमध्ये काहीतरी वेगळी विशेषता आहे ती ओळखयला शिका व त्यातच यश संपादन करण्याचा प्रयत्न करा.

# चोरीला गेलेल्या ११ दुचाकी जप्त

## पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाची कामगिरी

धाराशिव : प्रतिनिधी- पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने अट्टल दोघा दुचाकी चोरांना गजाआड केले आहे. त्यांच्या ताब्यातून लाखो रूपये किंमतीच्या ११ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई शनिवारी (दि. ९) केली.

धारशिव जिल्ह्यातील दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढुन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलर्कर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांच्या सुचनांप्रमाणे विशेष पथक रवाना झाले होते. या पथकामध्ये सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, पोहेकॉ विनोद जानराव,पोहेकॉ निंबाळकर, पोहेकॉ वाघमारे, पोहेकॉ सय्यद, पोना जाधवर, पोना ढागारे, पोकॉ अरसेवाड, पोहेकॉ अरब, चापोहेकॉ लाटे यांचा समावेश होता. हे पथक दुचाकी चोरीच्या



गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढत असताना ९ मार्च रोजी पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. राम माधव भोसले रा. खानापूर वाशी ह. मु. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर याने धाराशिव जिल्हयातील व परजिल्ह्यातील बजयाच दुचाकी चोरी केलेल्या असून तो सध्या पारडी फाटा येथे एक चोरीची दुचाकी घेवून थांबलेला आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने हे पथक पारडी फाटा येथे गेले. त्यावेळी राम भोसले याला ताब्यात घेवून त्याच्या ताब्यात असलेली दुचाकी जप्त केली. त्या दुचाकीची खात्री केली असता ती पोलीस ठाणे धाराशिव शहर येथील असल्याची खात्री झाली. तसेच त्याच्याकडे आणखीण सखोल चौकशी केली असता त्याने दारुच्या नशेत धाराशिव शहर, येरमाळा, मुरुम, भूम येथून अनेक दुचाकी चोरी केलेल्या आहेत. तसेच मुरुड जि. लातूर येथे एक घरफोडी करुन तेथुन पण एक दुचाकी चोरी करुन आणलेली आहे. सदर दुचाकीची चोरी केल्याची व त्या दुचाकी त्याने त्याच्या राहत्या घरी पांगरी येथे लपवून ठेवल्या असल्याचे सांगितले. या पथकाने आरोपीच्या रहात्या घरी जावून छापा मरला असता, त्याठिकाणी आरोपीच्या ताब्यातून एकुण १० चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या. तसेच चोरीच्या दुचाकी जप्त करुन हे पथक धाराशिवकडे येत असताना माहिती मिळाली की, सौरभ चंद्रकांत शिंगाडे रा. बौध्द नगर, धाराशिव यांच्याकडे धाराशिव शहर ठाण्यातील गुन्ह्यातील एक होन्डा ॲक्टीवा ही दुचाकी जप्त केली आहे. अशा एकुण ११ चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. आरोपीकडून पोलीस ठाणे धाराशिव शहर गुन्ह्यातील होन्डा ॲक्टीवा, पोलीस ठाणे येरमाळा गुन्ह्यातील हिरो होन्डा स्प्लेंडर, येरमाळा पोलीस ठाणे येथील हिरो होन्डा स्प्लेंडर, पोलीस ठाणे मुरुम मधील एचएफ डिलक्स, पोलीस ठाणे भूम मधील होन्डा शाईन, पोलीस ठाणे मुरुड मधील होन्डा शाईन, तसेच आणखी ४ दुचाकी याच्या चेसीस नंबर व इंजिन नंबर वरुन त्या कुठल्या पोलीस हद्दीतुन आरोपीने चोरी केल्या आहेत याची खात्री करणे चालु आहे.ही कामगीरी पोलीस अधीक्षक अतुल कुलर्कर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदश्‍नाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, विशेष पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस हावलदार- विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, अशोक ढागारे, पोलीस अमंलदार रविंद्र आरसेवाड, चालक पोहेकॉ अरब, लाटे यांच्या पथकाने केली.

# दयानंद कला महाविद्यालयात शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यास प्रारंभ




लातूर / प्रतिनिधी- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांच्याही क्षमता वृध्दींगत केल्या जाणार आहे. त्यामुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास आव्हान न समजता संधी समजून आपल्या क्षमता वृद्धिगत कराव्या असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड येथील प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी यांनी केले. त्या दयानंद कला महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित लातूर तालुकास्तरीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.

पुढे त्या म्हणाल्या की, शिक्षकाने वेळोवेळी अद्यावत राहावे यासाठी वर्षभरातून पन्नास तासांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे. यातून आपल्या क्षमता विकसित होतील ज्याचा लाभ विद्यार्थ्यांना होईल.

या प्रसंगी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिलकुमार माळी,डायटचे विषय सहाय्यक निशिकांत मिरकले यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उद्घाटन कार्यक्रमासाठी शिक्षण विस्तार अधिकारी सी एस म्हेत्रे, तज्ञ सुलभक व लातूर तालुक्यातील अनेक शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, विज्ञानाच्या वाढत्या प्रगती बरोबरच शिक्षण व्यवस्थेत बदल होत असतात.

त्यामुळे शिक्षकांनी नेहमीच अद्यावत राहणे काळाची गरज आहे. या प्रशिक्षणातून ती संधी शिक्षकांना मिळाली आहे याचा लाभ घेऊन आपण अद्यावत व्हावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवी कुलकर्णी यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. दिनेश जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले.

# प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

लातूर : लातूर जिल्ह्यातील रेणापूर, लातूर, औसा तालुक्यामधून जाणारा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीच्या आड येत असल्याने तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढे आहे की, राज्यशासनाचा नागपूर ते गोवा हा पवनार ते पत्रादेवी हा शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित आहे. ह्या महामार्गामुळे शेतकऱ्यांची उरली - सुरली जमीन यात जाणार आहे. शेतकऱ्यांकडील शेती आता गुंठेवारीवर आलेली आहे.ह्या महामार्गामुळे ज्या शेतकऱ्यांच्या शेतात मधोमध रस्ता गेला आहे, त्या शेतकऱ्यांना दुसऱ्याच्या शेतात जाण्यासाठी रस्ता नसणार आहे. तसेच ह्या महामृगामुळे पाण्याचा प्रवाह अडणार आहे तसेच प्रवाह बदलला जाणार आहे. अनेक शेतकरी भूमीहिन होणार आहेत. आमची जमीन बागायती असून आमच्या जमिनी मांजरा पट्टा , मांजरा धरणाखाली व तावरजा प्रकल्पाखाली येतात.

सुपीक जमिनी महामार्गाच्या आड येत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याने हा महामार्ग रद्द रद्द करण्यात यावा. हा महामार्ग रद्द नाही केल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मराज पाटील, लातूर तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे, जवळा ( बु. ) अध्यक्ष अनिल ब्याळे , शेखर ब्याळे , जिल्हा उपाध्यक्ष महारुद्र चौंडे , एड. विजयकुमार जाधव, बसवराज झुंजारे , शंकर झुंजारे ,व्यंकट कराड, गुंडाप्पा भोसले, बाबू स्वामी, महेश हावळ , हणमंत जाधव, प्रकाश सवासे , सुधाकर जवळेकर, सुधीर कुलकर्णी , व्यंकट पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कानेगावची शाळा शिरूर अनंतपाळ तालुक्यात द्वितीय



शिरूरआनंतपाळ :महाराष्ट्र शासनाने १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी कालावधीत राबविलेल्या शिक्षण व्यवस्थेमधील उपक्रम कोणती शाळा अचूक राबविते यासाठी केंद्रस्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत ममुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळाफ ही स्पर्धा आयोजित केली होती.या स्पर्धेत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

राज्याच्या शिक्षण विभागाने केंद्र स्तरावर, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर सुंदर शाळेची स्पर्धा आयोजित केली होती .शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी तसेच स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे यासाठी राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांचचे वृक्ष संवर्धनासाठीचे उपक्रम, शालेय व्यवस्थापन समितीने शाळेच्या सक्रिय विकासात सहभाग घेण्यासाठी घेतलेले उपक्रम,स्वच्छता मॉनिटर,सामाजिक बांधिलकीचे उपक्रम असे अनेक कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये शाळा व परिसराचे सौंदर्यीकरण, विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांमधील तसेच व्यवस्थापनातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग, शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम, शाळेची इमारत व परिसराची स्वच्छता, राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबतचे उपक्रम अशा विविध बाबींचा समावेश होता. या शाळेत पहिली ते आठवी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेतात.शाळेतील विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांनी या उपक्रमामध्ये हिरेरीने सहभाग घेतला.लातूर जिल्ह्यातील पहिली तंबाखूमुक्त शाळा,वर्गांची सजावट, पोषण आहाराअंतर्गत परसबागेतील फळबागेतील माहिती,भाषण,क्रीडा, कला विविध स्पर्धेच्या उपक्रमाची माहिती, शाळेतील सुशोभिकरण, विद्यार्थ्यांकडून शिक्षकांनी करुन घेतलेल्या उपक्रमांमुळे ही निवड झाली. या निवडीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांचे शिरूर अनंतपाळ तालुक्याचे गटविकास अधिकारी बळीराम चव्हाण, गटशिक्षणाधिकारी अनुपमा भंडारी,शिक्षण विस्ताराधिकारी अनिल पागे,केंद्रप्रमुख दामाजी बालुरे,ईश्वर बिरादार, रमेश मुळे, विठ्ठल वाघमारे, तालुका समन्वयक सुनीलकुमार सातपुते, गटसाधन केंद्राचे सर्व विशेष साधनव्यक्ती जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती गोविंद चिलकुरे, सरपंच ब्रह्मानंद शिवनगे उपसरपंच राम आटरगे, केंद्रीय मुख्याध्यापक वीरेंद्र उस्तुर्गे, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# तेरचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी पायाभरणी : आ. पाटील

धाराशिव (प्रतिनिधी) - आधुनिक भारतामध्ये तेरची वेगळी ओळख निर्माण करत गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वंकश विकास आराखडा तयार करण्यात आला असून प्राचीन वारसा स्थळांना नवीन झळाळी देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. जागतिक स्तरावर तेरचे नाव पोहोचविण्यासाठी नियोजन बध्द काम सुरू असून येथे वैभव, समृध्दी, रोजगार यावा व येथील वैभवशाली इतिहास जगासमोर मांडता यावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.९ मार्च रोजी केले.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील संत गोरोबाकाका मंदिर परिसरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन आ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यासह प्रयत्नांतून तेर ता. धाराशिव येथील श्री संत गोरोबाकाकांच्या मंदिर व परिसराच्या विकासासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व पर्यटन विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सब स्टेशन ते गोरोबाकाका मंदिर रस्त्याचे रुंदीकरण करणे ९ कोटी रुपये, संत गोरोबाकाका तीर्थक्षेत्र परिसर सुधारणा यामध्ये प्रवेशद्वार, लाकडी मंडप व इतर कामांसाठी ६ कोटी ८५ लाख रुपये, भक्तनिवास उर्वरित बांधकाम करणे २ कोटी १५ लाख रुपये, पुरातत्व विभागाकडून गोरोबाकाका मंदिर परिसर जन सुविधा केंद्राचे बांधकाम करणे १ कोटी १७ लाख रुपये, तर जिल्हापरिषदेच्या माध्यमातून संत गोरोबाकाका परिसर विकास संरक्षण भिंत पेव्हर ब्लॉक व पाण्याची सोय करणे आदी बाबींसाठी १ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून या विकासकामांचे भूमिपूजन आ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यासह तीर्थकुंड, त्रिविक्रम मंदिर, चैत्यगृह, कोट टेकडी या स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी जवळपास रु. २३ कोटी असे एकूण रु ४३ कोटीहून अधिकचा निधी देण्यात आला आहे.

पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, डॉ. पद्मसिंह पाटील यांनी केलेल्या अभूतपूर्व कामांमुळे जिल्ह्याच्या विकासात मोठी भर पडली आहे. ठाकरे सरकारच्या काळात रखडलेले कालवा दुरुस्तीचे काम, रेल्वेसाठी राज्य सरकारचा वाटा, टेक्निकल टेक्टस्टाइल पार्क यासारखे विषय महायुतीच्या काळात वेगाने मार्गी लागले. कोल्हापूर, सांगलीच्या पुरात वाहून जाणारे पाणी जिल्ह्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शाश्वत पाणी, उद्योग व धार्मिक पर्यटनाच्या माध्यमातून उन्नती साधण्यासाठी आपण काम करत असून धाराशिव, तुळजापूर, तेर झपाट्याने बदलतयं याची प्रचिती आपल्या सर्वांना येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नेताजी पाटील, पद्माकर फंड, शिवाजीराव नाईकवाडी, निहाल काझी, सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, हभप शिवाजी महाराज रोगे, भास्कर माळी, जुनेद मोमीन, अजीत कदम, प्रविण साळुंखे, नवनाथ पसारे, संजय लोमटे, किशोर काळे, प्रतिक नाईकवाडी, रविराज चौगुले, अभिजीत बैरागी, गणेश फंड, अभिजात सराफ, सोमनाथ फासे, सतीश कदम, अर्शद मुलाणी आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यशवंत
धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १२ मार्च २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## डॉ.आंबेडकर कारखान्याच्या गाळप हंगामाची सांगता



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगाम सन २०२३-२४ चा समारोप सांगता कारखान्याचे व्हाईस चेअरमन विलास भुसारे व अतुलसिंह बायस यांच्या हस्ते विधिवत गव्हाणची पूजा करून दि.९ मार्च रोजी करण्यात आली. धाराशिव तालुक्यातील केशेगाव येथील बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्यातच्या गळीत हंगामाची सांगता करण्यात आली. यावेळी प्रास्ताविक ऍड.चित्राव गोरे यांनी केले. तसेच विलास भुसारे, ऍड. निलेश बारखडे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करून या हंगामामध्ये सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, वाहतूक तोड यंत्रणा, हार्वेस्टर, कारखान्याचे सर्व हितचिंतक यांनी जे सहकार्य केले त्यांच्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच प्रतिनिधिक स्वरूपामध्ये जास्तीत जास्त ऊसतोड करून कारखान्याला पुरविल्याबद्दल ऊस तोड वाहतूक यंत्रणेतील प्रथम, द्वितीय व तृतीय अशी प्रोत्साहनपर बक्षीस देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सर्व संचालक, खाते प्रमुख, कर्मचारी, उत्पादक, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# खा. राजेनिंबाळकर यांनीच सावंत यांच्यासाठी मातोश्रीचा दरवाजा उघडला – राजेनिंबाळकर

## यापुढे सावंत यांना जशास तसे उत्तर दिले जाईल

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांनी खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना लोकसभा निवडणुकीसाठी तिकीट मिळावे म्हणून पक्षास १० कोटी रुपयांचा निधी दिला असे सांगितले. पक्षासाठी तुमच्यासारखे अनेकजण निधी देतात. मात्र मातोश्रीचे दरवाजे खासदार ओमराजे यांनीच पहिल्याप्रथम तुमच्यासाठी उघडले याची जाणीव ठेवा असा पलटवार शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख मकरंद उर्फ नंदु भैय्या राजेनिंबाळकर यांनी दि.११ मार्च रोजी केला. दरम्यान, मंत्रीपद दिले ते लोकांचे वडील काढण्यासाठी नसून लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिले आहे. विशेष म्हणजे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या शस्त्रक्रियेसाठी आपण आरोग्य मंत्री म्हणून त्या फाईलवर सही केली. तो कर्तव्याचा भाग होता. मात्र आपण त्यांच्यावर उपकार केले नसल्याचे त्यांनी सांगितले.

धाराशिव येथील राजे कॉम्प्लेक्स येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना जिल्हा सहसंपर्कप्रमुख राजेनिंबाळकर महाले की, दि. ७ व ८ मार्च रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी औसा, उमरगा, तुळजापूर, कळंब, परंडा व भूम येथे दौरा करून पाच ठिकाणी सभा घेतल्या. त्यानंतर मंत्री सावंत यांनी अतिशय खालच्या पातळीवर जाऊन खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर व माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्यावर टीका केली. आजपर्यंत अशा पद्धतीची टीका जिल्ह्यात झालेली पाहायला मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी सावंत यांचा जाहीर निषेध व्यक्त केला. जिल्हा भाई उद्धवराव पाटील यांच्या नावाने लौकिक झालेला आहे. परंतू आता हा जिल्हा बदनाम झाला असल्यामुळे सर्व पक्षाच्या नेत्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणाऱ्या लोकप्रतिनिधींना हद्दपार करावे असे आवाहन त्यांनी केले. तर २०२२ नंतर सत्तांतर झाल्यानंतर सावंत यांनी पालकमंत्री झाल्यापासून अतिशय खालच्या पातळीचे वागणे व बोलणे सुरू केले आहे. सर्वसामान्य नागरिकांना देखील अशा प्रकारचे वक्तव्य करणारा माणूस नकोसा झाला असल्याचे सांगत सावंत यांच्या बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे त्यांना पालकमंत्रीपद कशासाठी मिळाले ? मंत्री म्हणून जी शपथ घेतली त्याचा त्यांना बहुदा विसर पडलेला दिसत असल्याचा टोला लगावला. तसेच कृष्णा खोऱ्याच्या पाण्याची पाहणी करून ते पाणी माझ्यामुळेच आले असा भास निर्माण केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या पाण्यासाठी २००४ साली तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार मधुकरराव चव्हाण यांनी खूप मोठा पाठपुरावा असल्याचे सांगितले. तर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे झाल्यानंतर खासदार ओमराजे व आमदार कैलास पाटील यांनी या योजनेतील कामाचे प्राधान्यक्रम बदलून घेतले. त्यामुळे निधी उपलब्ध करुन निविदा प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळी खासदार ओमराजे व आमदार कैलास पाटील यांनी हे पाणी जून – जुलै २०२४ अखेरपर्यंत धाराशिव जिल्ह्यात येणार असल्याचे सांगितले होते. दरम्यान सत्तांतर झाल्याने हे काम सुरळीतपणे सुरू आहे. मात्र मंत्री सावंत हे मी पाणी आणणार असल्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असून दीड वर्षात पाणी येत नसते असे सांगितले.

खासदार ओमराजे यांचे वडील कै पवन राजेनिंबाळकर हे संपूर्ण जिल्ह्याला माहित आहेत. त्यांच्या नखाची देखील बरोबरी होऊ शकत नाही. त्यांनी निस्व:र्थपणे मदत केली. मात्र आपण ज्या पद्धतीने राजकारण करता हे यापुढे अजिबात खपवून घेतले जाणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

ढोकी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कचऱ्याचे पैसे देण्यासाठी १५ ते २० कोटी रुपये देण्याची मागणी केली होती. कचऱ्याची कामे १५ व्या वित्त आयोगातून केली जातात. मात्र तो निधी का येत नाही यासाठी आपण काय प्रयत्न केलेत का ? हे सांगावे असे आव्हान करीत मूलभूत गरजा कडे लक्ष न देता भडकाऊ भाषण करून निवडणुकीचे राजकारण करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सावंत हे आरोग्य मंत्री असून महाविकास आघाडीच्या काळात जिल्ह्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यात आले. मात्र सावंत यांनी या महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या आस्थापनेची वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर नर्स, वार्ड बॉय व इतर कर्मचाऱ्यांची पदे का भरली नाहीत ? असा सवाल त्यांनी केला. तसेच राजकारण करताना जनतेसाठी काम करतो का ? ते पाहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री नसताना झेंडावंदन केले. त्यावेळी केलेल्या भाषणात जीडीपी इतर जिल्ह्यापेक्षा कमी आहे. तो मी वाढविण्यासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन सावंत दिले होते. आता किती आहे, तो कसा काढतात ? हे त्यांनी सांगावे असे आव्हान राजेनिंबाळकर यांनी दिले. तसेच बेफामपणे बोलत जायचे, कोणी विचारत नाही अशा अविर्भावात त्यांनी राहू नये. यापुढे अशा प्रकारचे वक्तव्य खपवून गेले जाणार नसल्याचा खणखणीत इशाराही त्यांनी दिला.

## नळदुर्ग - अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्ती कामास सुरवात

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – अनेक वर्षांपासून प्रलंबीत व न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेल्या नळदुर्ग – अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाचे भूमीपूजन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. भाविक व पर्यटकांच्या सोयीसाठी नळदुर्ग – अक्कलकोट रस्यां नच्या सुधारणे करीता निधी मंजुर करण्यात आला होता, मात्र या रस्त्यावरील काही शेतकऱ्यांनी जमीनीच्या मावेजा वरुन या कामास विरोध केला होता. अनेक वर्षे हा विषय न्यायालयीन प्रकियेत अडकल्याने या रस्युध वरील ग्रामस्थांना व प्रवाशांना मोठा त्रास होत होता. हा विषय मार्गी लावण्यासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी अस्तीत्वातील रस्यायाच्या दुरुस्तीचा मार्ग सुचविला होता. अधिकची जागा व त्यांचा मोबदला हा विषय स्वतंत्र ठेवून अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या रस्त्याची उपलब्ध रुंदी कायम करून दुरुस्तीचे काम हाती घेण्यास मा. उच्च न्यायालयाने मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने या रस्याातच्या दुरुस्ती साठी रुपये ४ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. या १०.८० किमी.लांबीच्या रस्त्यासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण करुन ७ मार्चला कामाचा कार्यरंभ आदेश निर्गमीत करण्यात आला. यावेळी भाजपाचे तुळजापूर तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, सचिन पाटील, नय्यरभाई जहागीरदार, उदय जगदाळे, सुशांत भूमकर, संजय बताले, मुदस्सर शेख, पद्माकर घोडके, संजय जाधव यांच्यासह गावातील किशोर धुमाळ, किशीर सुरवसे, प्रमोद सोमवंशी, दत्ता पाटील, उषाताई मिटकर, बाळासाहेब पवार, नेताजी माडजे, नेताजी वचने एस के गायकवाड, कल्याण बिराजदार, हरीश पाटील, रामसिंग परिहार तसेच प्रमुख कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस करणार विविध मागण्यांसाठी जनआक्रोश आंदोलन

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – संपूर्ण धाराशिव जिल्हा दुष्काळ जाहीर करुन शेतकरी, शेतमजूर व सुशेक्षित बेरोजगारांचे सर्व कर्ज माफ करावे, यासह इतर मागण्यासाठी राष्टलवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बुधवारी (दि.१३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी ११ वाजता जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शप) जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दि.१०) एका निवेदनाद्वारे दिला आहे. खरीप २०२३ मधील शेतकऱ्यांचे नगदी पीक सोयाबीन कमी पावसामुळे हातचे निघून गेले. २०२३ मधील रब्बी हंगामातील हरभरा पीकाला एकरी एक क्विंटल उतार मिळाला, शेतीला पाणी नाही, विहीरीनी तळ गाठला आहे. शेतकरी, शेतमजूर व सुशिक्षीत बेकार युवक भयग्रस्त झालेला आहे. जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील अडीअडचणी विषयी वेळोवेळी लेखी निवेदन देवूनही आजतागायत त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्या निषेधार्थ सामान्यांचा जनआक्रोष व्यक्त करण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्हा तीव्र दुष्काळ जाहीर करुन दुष्काळी अनुदानाचे वाटप ताबडतोब करावे. शेतकरी, शेतमजूर व सुशेक्षति बेरोजगाराचे संपूर्ण कर्ज माफ करावे.



गाईच्या दुधाला ४० तर म्हशीच्या दुधाला ७० रुपये लिटर प्रमाणे भाव देवून सरकारने घोषीत केलेले प्रती लिटर ५ रुपयचे अनुदान त्वरीत वाटप करावे. २०२२ चा शिल्लक पीक विमा रक्कम त्वरीत वाटप करावी, सन २०२३-२०२४ मधील पीक विमा आग्रीम रक्कम सर्व शेतकजयांना त्वरीत वाटप करावी, २०२३ चा संपूर्ण पीक विमा मिळावा. अन्यथा पीक विमा कंपनीला काळ्या यादीत समाविष्ट करावे. जिल्ह्यातील नगर परिषद व ग्रामीण क्षेत्रााातील पाणी नियोजन, रस्ते व स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे. त्यावर तात्काळ कारवाई करुन पाणी, रस्ता व स्वच्छतेचे नियोजन तात्काळ करण्यात यावे. टेंभूर्णी लातूर चौपदरीकरणाचे काम त्वरीत चालु करण्यात यावे. मागील दोन वषार्पासून जिल्हा परिषद व पंचायत समितीला मिळणारे वित्त आयोगाचे १८० कोटी त्वरीत देण्यात यावे. शासनाकडून या मागण्याची दखल न घेतल्यामुळे जनआक्रोष व्यक्त करीत असल्याचे दुधगावकर यांनी सांगितले आहे.

## पशुधनाची गुणात्मक पिढी निर्माण करण्याचे धोरण

धाराशिव दि.११(प्रतिनिधी) – आगामी काळात राज्यात केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक पशुधनाची पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाने धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे. दुग्ध उत्पादन वाढीचा उद्देश समोर ठेवून पशुसंवर्धन विभागाने पंचसूत्री कार्यक्रम अवलंबिला आहे.

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाच्या सचिवांच्या संकल्पनेतून पंचसूत्री कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.सद्य:स्थितीत हवामान बदलामुळे शेती व्यवसायात काहिशी अनिश्चितता निर्माण झाली असली तरी शेतीला पूरक किंबहुना मुख्य व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायाची वाट निवडणे गरजेचे बनले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या योजनांचा शेतकऱ्यांना लाभ देत त्यांच्यामध्ये पुन्हा नवी उमेद जागविण्याचा व नवीन पशुउद्योजक निर्माण करण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभाग करीत आहे. पशुसंवर्धन विभागाकडून पशुपैदास सुधारणा, पशुधनाचे आरोग्य, वैरण विकास, पशुखाद्य आणि पशुधनाचे व्यवस्थापन ही पंचसूत्री अंमलात आणण्यात येत आहे. पशुपालकांना पशुउद्योजक म्हणून त्यांचा कायापालट करण्यासाठी ही पंचसूत्री मैलाचा दगड ठरणार आहे. परंतु पशुपालकांकडून किती प्रतिसाद मिळतो हे पहावे लागणार आहे.

### काय मिळणार पशुपालकांना ?

पशुपैदास सुधारणा या कार्यक्रमामध्ये आनुवंशिक सुधारणा व नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून उच्च गुणवत्ता व उत्पादकता असलेल्या पशुंची निर्मिती व त्यांच्या नवीन जातींची ओळख करून त्यांची उत्पादकता वाढविण्यात येणार आहे. पशुधनाचे आरोग्य यामध्ये प्रतिबंधात्मक, प्रवर्तक, उपचारात्मक उपाययोजना करून पशुउद्योजकांना गुणवत्तापूर्ण पशुवैद्यकीय सेवा देण्याचा कार्यक्रम राबविला जाणार आहे. वैरण विकास उच्च पोषणमूल्य असलेल्या पौष्टिक वैरणीची निर्मिती करणे, मुरघास, वैरणीच्या विटा,अशा स्वरूपाच्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येणार आहे. पशुखाद्य उच्च पोषणमूल्य असलेल्या व पौष्टिक पशुखाद्याचा उत्पादनास व वापरास प्रोत्साहन देणे. पशुधनाचे व्यवस्थापन पशू व्यवस्थापनाच्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणे आणि त्यास चालना देणे.

### ग्रामीण अर्थचक्र होणार गतिमान

जिल्हयातील पशुपालकांनी दुग्ध उत्पादन वाढीसाठी, गोपालनाकरिता पशुपैदास, पशुधनाचे आरोग्य, वैरण विकास, पशुखाद्य, पशुधनाचे व्यवस्थापन या पंचसूत्री महत्त्वाची ठरणार आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनेद्वारे ग्राम अर्थचक्र गतिमान होण्यास हातभार लागणार असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी दिली.

## चोरीला गेलेल्या ११ दुचाकी जप्त; अट्टल चोर गजाआड

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने अट्टल दोघा दुचाकी चोरांना गजाआड केले आहे. त्यांच्या ताब्यातून लाखो रूपये किंमतीच्या ११ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई शनिवारी (दि. ९) केली.

धारशिव जिल्ह्यातील दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढुन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांच्या सुचनेप्रमाणे विशेष पथक रवाना झाले होते. या पथकामध्ये सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, पोहेकॉ विनोद जानराव,पोहेकॉ निंबाळकर, पोहेकॉ वाघमारे, पोहेकॉ सय्यद, पोना जाधवर, पोना ढागारे, पोकॉ अरसेवाड, पोहेकॉ अरब, चापोहेकॉ लाटे यांचा समावेश होता. हे पथक दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढत असताना ९ मार्च रोजी पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. राम माधव भोसले रा. खानापूर वाशी ह. मु. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर याने धाराशिव जिल्ह्यातील व परजिल्ह्यातील बजयाच दुचाकी चोरी केलेल्या असून तो सध्या पारडी फाटा येथे एक चोरीची दुचाकी घेवून थांबलेला आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने हे पथक पारडी फाटा येथे गेले. त्यावेळी राम भोसले याला ताब्यात घेवून त्याच्या ताब्यात असलेली दुचाकी जप्त केली. त्या दुचाकीची खात्री केली असता ती पोलीस ठाणे धाराशिव शहर येथील असल्याची खात्री झाली. तसेच त्याच्याकडे आणखीण सखोल चौकशी केली असता त्याने दारुच्या नशेत धाराशिव शहर, येरमाळा, मुरुम, भूम येथून अनेक दुचाकी चोरी केलेल्या आहेत. तसेच मुरुड जि. लातूर येथे एक घरफोडी करुन तेथुन पण एक दुचाकी चोरी करुन आणलेली आहे. सदर दुचाकीची चोरी केल्याची व त्या दुचाकी त्याने त्याच्या राहत्या घरी पांगरी येथे लपवून ठेवल्या असल्याचे सांगितले. या पथकाने आरोपीच्या रहात्या घरी जावून छापा मरला असता, त्याठिकाणी आरोपीच्या ताब्यातून एकुण १० चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या. तसेच चोरीच्या दुचाकी जप्त करुन हे पथक धाराशिवकडे येत असताना माहिती मिळाली की, सौरभ चंद्रकांत शिंगाडे रा. बौध्द नगर, धाराशिव यांच्याकडे धाराशिव शहर ठाण्यातील गुन्ह्यातील एक होन्डा ॲक्टीवा ही दुचाकी जप्त केली आहे.




अशा एकुण ११ चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. आरोपीकडून पोलीस ठाणे धाराशिव शहर गुन्ह्यातील होन्डा ॲक्टीवा, पोलीस ठाणे येरमाळा गुन्ह्यातील हिरो होन्डा स्प्लेंडर, येरमाळा पोलीस ठाणे येथील हिरो होन्डा स्प्लेंडर, पोलीस ठाणे मुरुम मधील एचएफ डिलक्स, पोलीस ठाणे भूम मधील होन्डा शाईन, पोलीस ठाणे मुरुड मधील होन्डा शाईन, तसेच आणखी ४ दुचाकी याच्या चेसीस नंबर व इंजिन नंबर वरुन त्या कुठल्या पोलीस हद्दीतुन आरोपीने चोरी केल्या आहेत याची खात्री करणे चालु आहे. ही कामगीरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, विशेष पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, अशोक ढागारे, पोलीस अमंलदार रविंद्र आरसेवाड, चालक पोहेकॉ अरब, लाटे यांच्या पथकाने केली.

## आर.पी. औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन साजरा

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुलातील आर. पी. औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयामध्ये डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी धनेश्वरी शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. शिल्पा प्रतापसिंह पाटील, लेखिका अस्मिता सचिन ओंबासे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली टेलोरे, के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रा डॉ.शोभा टोले, उद्योजिका अर्चना अंबुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख आदी उपस्थित होते. यावेळी वृषाली टेलोरे यांनी स्त्री-पुरुष समानता व महिला सबलीकरण ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच टोले यांनी स्त्रियांचे समाजासाठी असलेल्या



योगदानाबद्दल आणि भगवान श्री शंकराचे अर्ध नारीच्या नटवेश्वराचे रुप हेच सांगत आले की, दुष्ट शक्तीचा सामना करण्यासाठी तो आणि ती एकच असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तर ओंबासे यांनी महिलांचा प्रशासनामध्ये वाढत असलेला सहभाग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अंबुरे यांनी स्त्री शक्तीचा महिमा वर्णन करताना येणारा काळ हा स्त्रियांचा असून जगातल्या प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्री आघाडीवर व सर्वोच्च पदावर असल्याचे सांगितले. तसेच संस्थेच्या संचालिका डॉ.पाटील यांनी स्त्रियांचा प्रत्येक क्षेत्रामधला वाढत चाललेला सहभाग आणि पुरुषाच्या खांद्याला खांदा देऊन स्त्री सक्षमीकरणाचा वाढत चाललेला प्रभाव स्पष्ट केला. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या सहाय्यक प्रा. शिवानी डोके यांनी तर सूत्रसंचालन कु. शिवानी येडे व मधू लक्ष्मी थोरात यांनी व आभार प्रा.अबोली ठाकूर यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाराष्ट्र शासन

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर, मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ.**

**परिशिष्ट-३ प्रेस नोटीस**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**पत्ता : कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग, लातूर, सिंचन भवन, जुना औसा रोड, लातुर - ४१३५१२.**

ई-मेल पत्ता : eemid.laturwrd@maharashtra.gov.in

दुरध्वनी क्रमांक: (०३८२) २००९२७.

**ई-निविदा सुचना क्रमांक ब-१/०४ सन २०२३-२४ (ऑनलाईन)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग, लातूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येवून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग, लातुर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदेची अंदाजित किंमत (GST) वगळून रुपये लाखात |
|---|---|---|
| ०१ | मानार नदीवरील सोनखेड को.प. बंधाऱ्याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर जि.लातूर. | रुपये लाखात रु. १२६७.२५ |
| ०२ | मानार नदीवरील मानखेड को.प. बंधा-याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर जि.लातूर. | रु. १३०४.४६ |
| ०३. | मानार नदीवरील मावलगाव-१ को.प. बंधा-याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर जि.लातूर. | रु. ११६९.४६ |
| ०४. | मानार नदीवरील मावलगाव-२ को.प. बंधा-याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर जि.लातूर. | रु. ११८७.०१ |
| ०५. | मानार नदीवरील चिलखा को.प. संधाऱ्याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर जि.लातूर. | रु १३४७.५९ |
| ०६. | मानार नदीवरील येस्तार को. प. बंधाऱ्याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम ता. अहमदपूर | रु. १५९४.४६ |
| ०७. | मानार नदीवरील टाकळगाचं-शेनकुड को. प. बंधा-याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम | रु. १६०६.९३ |
| ०८. | तिरु नदीवरील टाकळगावं-शेळगावं को.प. बंधा-याचे विस्तार व सुधारणा अंतर्गत बॅरेज मध्ये रुपांतरण करणेचे काम | रु. १२७२.१७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि १२/०३/२०२४ ते ०१/०४/२०२४
Geo-tagging कालावधी : दि१८/०३/२०२४ ते २२/०३/२०२४
ई-निविदा उघडणे : दि.०३/०४/२०२४
खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
संकेतस्थळ-http://mahatenders.gov.in
**जा.क्रं. लालपावि/लेखा-०२/९१७/सह** **दि. ११ /०३/२०२४**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
लातुर लघु पाटबंधारे विभाग, लातुर.

Executive Engineer
Latur Minor Irrigation
Division LATUR

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**लातूर लघु पाटबंधारे विभाग लातूर**

# स्टेट बँकेची मागणी फेटाळत सुप्रीम कोर्टाने दिला दणका!

नवी दिल्ली : स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांचा तपशील जाहीर करण्यासाठी सुप्रीम कोर्टाकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. मात्र, ही मागणी फेटाळून लावत सुप्रीम कोर्टाने स्टेट बँकेला दणका दिला आहे. शिवाय उद्याच निवडणूक रोख्यांची माहिती निवडणूक आयोगाला देण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने स्टेट बँकेला दिले आहेत. त्यामुळे हा स्टेट बँकेला मोठा झटका असल्याचं बोललं जात आहे. स्टेट बँकेने निवडणूक रोख्याची माहिती देण्यासाठी सुप्रीम कोर्टाकडे ३० जूनपर्यंतची वेळ मागितली होती. पण, आतापर्यंत तुम्ही काय केलं असं म्हणत सुप्रीम कोर्टाने बँकेला फटकारलं आहे.

पान १ वरून

### राज्यात...

गाळपापासून २५.६ लाख टन साखर उत्पादित केली आहे. पुणे विभागात २०४ लाख उसाच्या गाळपापासून २१.२ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. त्या खालोखाल सोलापूर विभागाने देखील २०१ लाख उसाचे गाळप करून १८.७ लाख टन साखर उत्पादित केली आहे. सोलापूर विभागाचा सरासरी साखर उतारा ९.२८ टक्के इतका आहे. नगर विभागात १२४ लाख टन उसाचे गाळप झाले असून त्यातून १२.४ लाख टन साखर तयार झाली आहे. नगर विभागाचा साखर उतारा ९.१९ टक्के इतका आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातून ९० लाख टन उसाच्या गाळपामधून ७.९ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. तर साखर उतारा ८.८ टक्के इतका आहे.

नांदेड विभागात १०९ लाख टन गाळपातून ११ लाख टन साखर उत्पादित झाली आहे. या विभागाचा साखर उतारा १०.०९ टक्के इतका आहे. अमरावती विभागात ९ लाख टन ऊस गाळपातून ८ लाखक्विंटल साखर उत्पादित झाली आहे. या विभागाचा साखर उतारा ९.२६ टक्के इतका आहे. सर्वात कमी तीन लाख टन उसाचे गाळप नागपूर विभागात करण्यात आले असून येथे केवळ १.९३ लाखक्विंटल साखर उत्पादित झाली आहे. राज्यात सर्वात कमी केवळ ५.४१ टक्के साखर उतारा नागपूर विभागाचा आहे.

### या दिवसापासून...

निर्णय घेण्यात येणार आहे.

केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोगाच्या नियुक्ती संदर्भात समिती स्थापन करण्यात येणार आहे. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी पाच नावांचे दोन स्वतंत्र पॅनेल तयार करण्यात येणार आहे. या समितीमध्ये गृह सचिव आणि कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे सचिव यांचा समावेश असेल. केंद्रीय मंत्री आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते अधीर रंजन चौधरी यांच्यासह पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती, निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्तीसाठी दोन व्यक्तींची नावे देईल. त्यानंतर राष्ट्रपती निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करतील.

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हयातील लातूर म.न.पा. हद्दीतील सर्व जनतेस, वित्तीय संस्थेस या जाहीर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार मनियार अल्ताफ रहेमानसब रा. तांबोळी गल्ली लातूर ता. जि. लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शीवलेले कागदपत्र व अधिकृत केल्यावरून लातूर ता. जि. लातूर येथील तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, मनियार अल्ताफ रहेमानसाब यांनी खरेदी आधारे घेतलेल्या त्याच्या मालकी व कब्जे वाहीवाटीचा प्लॉट मौजे लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्वे नं.२४०/आ/१ पैकी प्लॉट नं ५८ चा पूर्व भाग याची लांबी दक्षीण उत्तर ४० फुट व रूंदी पूर्व पश्चिम २० फुट असुन याचे एकूण क्षेत्रफळ ८०० चौ. फुट होतात तसेच सदर प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.
पूर्वस परमेश्वर भोसले यांचा प्लॉट सरकारी रस्ता
पश्चिमेस : सदरच्या प्लॉट चा उर्वरित भाग
दक्षीणेसः २० फुट रस्ता
उत्तरेस : भाणूदास बरुरे यांचा प्लॉट
येणे प्रमाणे वरील चतूः सिमेच्या आतील प्लॉट / घरजागा ही नागनाथ रामा येरमे यांनी नसीमा बेगम अब्दुल रहेमान यांच्या कडून नोंदणीकृत खरेदीखत दस्त डे. बूक क्र.२८३३/१९९५ अन्वये खरेदी घेतला होता सदर नोंदणीकृत खरेदीखत दस्त डे. बूक क्र. २८३३/१९९५ दि. २३/११/१९९५ व दस्ताची नोंदणी पावती ची मुळ प्रत हे दि २७/०२/२०२४ रोजी झेरॉक्स काढण्या करिता रेणापूर नाका ते गोलाई येथे दुचाकीवरून प्रवासात पडून गहाळ / हरवले आहे. सदर मुळ खरेदीखत दस्त डे. बूक क्र.२८३३ /१९९५ दि. २३/११/१९९५ (लिंकिंग खरेदीखत) सदर दस्ताची व नोंदणी पावतीची आवशक्यता माझे पक्षकारास बँकेच्या / फायनान्सच्या कामाकरिता पडलेली आहे. माझ्या पक्षकाराने वरील नमूद मुळ खरेदी खत व सदर दस्ताची व नोंदणी पावती चा शोध / तपास घेतला व तसेच संबधीत पोलिस स्टेशनला मुळ खरेदी खत व सदर दस्ताची व नोंदणी पावती गहाळ हरवले बाबतची तक्रार देखील केलेली आहे. परंतु माझे पक्षकारास सदर नोंदणीकृत खरेदीखत दस्त डे. बूक क्र. २८३३/१९९५ दि. २३/११/१९९५ व दस्ताची नोंदणी पावती ची मुळ प्रत जर कोणास मिळून आल्यास माझे खालील नमुद पत्त्यावर सात ७ दिवसात परत कराव्यात, सबब हे जाहीर प्रगटन
दिः ११/०३/२०२४
**तर्फे:**
**अ‍ॅड. कल्पना एम भुरे**
**(सुलगुडले नॉटरी)**
**नोटरी भारत सरकार**
**पार्वती निवास बसवेश्वर कॉलनी**
**ब्लॉक नं २३, औसा रोड लातूर**
**मोबा-८७८८०१६८१५,**
**९८२२८८७७४५**

**जाहीर प्रगटन देणार**
**मनियार अल्ताफ**
**रहेमानसब रा. तांबोळी**
**गल्ली लातूर**
**ता. जि. लातूर**

## जाहिर प्रगटन

माझे पक्षकार हकिम ताजोद्दीन मुल्ला रा. जवळगा ता. देवणी जि. लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, मौजे सारोळा लातूर येथील जमीन गट क्र. १७१/१ पैकीचा प्लॉट क्र. ५० चा दक्षिण भाग, ग्रा.पं.क्र. ११२९ पैकी ज्याची लांबी पुर्व पश्चिम ३५ फुट व रुंदी दक्षिण उत्तर ३० फुट असे एकुण १०५० चौ. फुट त्याची चतुः सिमा, पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : इम्रान सौदागर यांची घरजागा, दक्षिणेस-गटातील जमीन, उत्तरेस : सदर प्लॉटचा उर्वरित भाग.येणेप्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील प्लॉट खरेदीखत क्र. ४६३/२०१७ दि. २४/०१/२०१७ रोजी अन्वये हाफिज शबाहोद्दिन सय्यद यांच्या नावे असून, त्यांच्याकडून करारा अन्वये खय्युम मुक्तार यांनी घेतलेला व त्यांच्याकडून कराराअन्वये इस्माईल इमाम कल्याणी रा. विवेकानंद चौक लातूर यांनी घेतलेला वर नमुद प्लॉट कल्याणी यांनी माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन, ठरावापोटी कांही रक्कम इसार म्हणुन स्विकारली आहे व सदरील प्लॉट सर्वतोपरी निर्वीवाद असल्याची हमी दिली आहे व प्लॉटचे मुळमालक यांच्याकडुन माझे पक्षकाराचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन देण्याची हमी व विश्वास दिला आहे. तरी सदरील प्लॉटबाबत कोणाचा काही हक्कसंबंध, हितसंबंध, कर्जबोजा, दान, गहाण, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, वाटणी, वारसाहक्क, न्यायालयीन वाद इ. कांही असल्यास त्यांनी सदर प्रगटन

प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत माझे खालील कार्यालयीन पत्त्यावर लेखी उजर कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीत कोणाचा कांही उजर नाही आल्यास सदर प्लॉट सर्वतोपरी निर्वीवाद व निर्जोखीम आहे असे समजुन माझे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर आलेले उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक : ११/०३/२०२४
तर्फे :

**अ‍ॅड. रब्बानी एस. बागवान,**
**नोटरी भारत सरकार**
**ऑ. लाल गोडावुन जवळ,**
**साळे गल्ली लातूर.**
**मो.क्र. ९४२३७१९८११,**
**९५११६२७२५३**

**जाहीर प्रगटन देणार**
**हकिम ताजोद्दीन मुल्ला**

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.१६१ /२०२४
निशाणी क्र.07
ज्याअर्थी नामे Dnyanoba S /o Babarao Lanjile हे R/0 Hipparga ( Da) tq. Udgir Dist Latur दि.08/12/2021 रोजी -At. Hipparga ( Da) tq. Udgir Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Sushilabai W/o. Dnyanoba Lanjile ,-ge--70
2)Baburao Dnyanoba Lanjile ,-ge--48,Occu---gri
R/o -t. Hipparga ( Da) tq. Udgir Dist Latur
3) Minabai W/o Dnyanoba Shelke , -ge -54
4) Kavita W/o Sanjivredy Chamavar ,-ge-46,
5) Vanita W/o Narayan Peddavad,-ge-44
खालिल नमुद पाच व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1) Sushilabai W/oDnyanoba Lanjile ,-ge--70--Wife
2)Baburao Dnyanoba Lanjile ,-ge--48,--Son
3) Minabai W/o Dnyanoba Shelke , -ge -54--Daughter
4) Kavita W/o Sanjivredy Chamavar ,-ge-46,--Daughter
5)Vanita W/o Narayan Peddavad,-ge-44, -Daughter
अर्जदार यांनी Dnyanoba S /o Babarao Lanjile या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dnyanoba S /o Babarao Lanjile यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक07/03/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढिल तारीख:-08/04/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.७७ /२०२४
निशाणी क्र.07
ज्याअर्थी नामे Vaijnath S /o Tukaram Gawade हे R/0 Hyderabad दि.१९/०८/२०२१ रोजी -At. Hyderabad येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Savita S/o Vaijnath Gawade ,-ge--48,Ocu.-H.H.
-/p. Pochamma Basti,Panjagutta ,Hyderabad (-ndhra Pradesh) Premanant Resident of Shelal Tq.Udgir Dist. Latur
2) G Varsha Rani D/o Vaijnath Gawade ,-ge--25,Occu--H.H.
R/o -s -bove
खालिल नमुद दोन व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1) Savita S/o Vaijnath Gawade ,-ge--48 , --Wife
2) G Varsha Rani D/o Vaijnath Gawade ,-ge--25, -Daughter
अर्जदार यांने Vaijnath S /o Tukaram Gawade या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Vaijnath S /o Tukaram Gawade यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक११/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढिल तारीख:-१२/०३/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.१७६ /२०२४
निशाणी क्र.07
ज्याअर्थी नामे Govind S/o Sakharam Dage हे R/0 Udgir Tq.Udhir Dist.Latur दि.03/05/2023 रोजी -At. Udgir Tq.Udhir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) -runa W/o -nil Patange ,-ge--41,Ocu.-H.H.
R/o Gawali Galli,Near -rya Samaj Udgir Dist.Latur
खालिल नमुद एक व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1) -runa W/o -nil Patange ,-ge--41--Daughter
अर्जदार यांने Govind S/o Sakharam Dage या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Govind S/o Sakharam Dage यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक११/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढिल तारीख:-१८/०३/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

## जाहिर प्रगटन

मी अर्जदार बाबू नारायण सूर्यवंशी , रा. वांजरवाडा, ता. जळकोट, जि. लातूर येथील रहिवासी असून माझी मुलगी सोनाली बाबु सूर्यवंशी हिचा आधार कार्ड काढण्यासाठी जन्म दाखल्याची गरज असून तीची खरी जन्म तारीख 05-05-२००६ ही असून ती बरोबर आहे. वरील दिलेली माहिती सत्य व बरोबर असून जर ती खोटी आढळल्यास मी कोणत्याही शिक्षेस पात्र राहीन. तरी मी माझ्या मुलीच्या जन्म नोंदणी आदेश मिळण्यासाठी तहसील कार्यालय, जळकोट येथे अर्ज केला असून माझ्या मुलीच्या आधार कार्ड काढण्यासाठी जन्म दाखल्याची गरज आहे. तरी देण्यास हरकत नाही.

## जाहिर प्रगटन

मी अर्जदार दिलीप माणिक वाघमारे, रा. वांजरवाडा, ता. जळकोट, जि. लातूर येथील रहिवासी असून माझ्या आधारकार्ड वरील जन्म तारखेत चूक झाली असून माझी खरी जन्म तारीख १०.04.१९७५ही असून ती बरोबर आहे. वरील दिलेली माहिती सत्य व बरोबर असून जर ती खोटी आढळल्यास मी कोणत्याही शिक्षेस पात्र राहीन. मला जन्म नोंदणी दाखल्याची आवश्यकता आहे.मी जन्म नोंदणी आदेश मिळण्यासाठी तहसील कार्यालय, जळकोट येथे अर्ज केला असून पुढील शैक्षणिक कामासाठी जन्म दाखल्याची गरज आहे. तरी देण्यास हरकत नाही.





उदगीर मनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोर (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा
डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)
डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८



यशवंत

मंगळवार दि. १२ मार्च २०२४



# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com





**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग


# सामाजिक आरोग्यासाठी फॅमिली डॉक्टर संकल्पना आवश्यक




उदगीर(प्रतिनिधी):- धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर येथे उदगीर,देवणी व जळकोट या तालुक्यातील ऍलोपॅथी,आयुर्वेद,डेंटल,होमिओपॅथी व युनानी या विविध चिकित्सा पद्धतीच्या डॉक्टरांशी सुसंवाद या शनिवार,दिनांक:-०९ मार्च २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलताना सत्कारमुर्ती नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य खा.डॉ.अजित गोपछडे यांनी उपरोक्त उद्गार काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दत्तात्रय वि.पाटील हे होते तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.हनुमंत वडगावे,डॉ.चेतना अजित गोपछडे,आय.एम.ए.,उदगीरचे अध्यक्षडॉ.बाळासाहेबपाटील,यु.डी.ए.उदगीरचे अध्यक्ष डॉ.गोविंद सोनकांबळे,निमा,उदगीरचे अध्यक्ष डॉ.राजकुमार घोणसीकर,होमिओपॅथी डॉक्टर्स असोसिएशन,उदगीरचे अध्यक्ष डॉ.चंद्रकांत कोठारे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत कापसे ,उदगीर डॉक्टर्स वुमेन्स फोरमच्या अध्यक्ष डॉ.ज्योती मध्वरे,स्त्रीरोगतज्ञ असोसिएशन,उदगीर च्या अध्यक्ष डॉ.स्वाती पाटील,सामान्य रुग्णालय,उदगीरचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रविण पाटील,आय.एम.ए.उदगीरचे सचिव डॉ.महेश जाधव,निमा,उदगीरचे सचिव डॉ.प्रवीण देशमुख व अमरनाथ खुरपे,आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता व भगवान धन्वंतरी प्रतिमा पूजन-स्तवन व दीपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.महेश जाधव यांनी तर पाहुण्यांचा परिचय डॉ.स्वाती पाटील यांनी करून दिला. याप्रसंगी खा.डॉ.अजित गोपछडे व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. चेतना गोपछडे यांचा विविध चिकित्सा पद्धतीच्या डॉक्टरांच्या संघटनांच्या वतीने शाल,श्रीफळ व स्मृतीचिन्ह सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना डॉ.बाळासाहेब पाटील म्हणाले की नवीन क्लिनिक-दवाखाना-रुग्णालय सुरू करण्यासाठी व रिन्युअल करण्यासाठी विविध विभागांशी संबंधित कागदपत्रे पूर्ण करून सुद्धा अत्यंत गौण कारणास्तव प्रमाणपत्र मिळण्यामध्ये डॉक्टरांना येणाऱ्या अडचणींची व दिरंगाईची माहिती देऊन यासंदर्भात शासकीय यंत्रणाना गतिमानता यावी यासाठी योग्य ते दिशानिर्देश देण्याची अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.हनुमंत वडगावे यांनी राष्ट्रीय आरोग्य नियंत्रण कार्यक्रमा प्रभावीपणे राबविण्यात खाजगी वैदयकीय व्यावसायिकांचे महत्वपूर्ण योगदान आहे.त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या विषयांशी संबंधित योग्य ते सर्व सहकार्य डॉक्टरांना केले जाईल असे सांगितले.

सत्काराला उत्तर देताना खा.डॉ.अजित गोपछडे म्हणाले की पाश्चात्य संस्कृतीचा अंधानुकरण करताना आहार-विहारांमध्ये केलेल्या बदलामुळे,फास्ट फुड-जंक फूड च्या अतिसेवनामुळे रोगप्रतिकारक्षमता कमी होत चाललेली आहे तथा मधुमेह,उच्च रक्तदाब,कॅन्सर,स्थौल्य,इत्यादी जीवनशैली जन्य आजार निर्माण होत आहेत.अन्न,वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करताना रोगनिदान-औषधोपचार-शस्त्रक्रिया याकरिता जास्त खर्च पडणार नाही व याबद्दल संबंधित कुटुंबाच्या आर्थिक विवंचनेत भर पडणार नाही याचा विचार करून आरोग्य रक्षणासाठी प्रत्येक चिकीत्सा पद्धतीच्या डॉक्टरांनी रुग्णांवर औषधोपचार करताना रुग्ण व त्यांचे कुटुंबीय यांचे प्रकृतीनुसार नियमित-संतुलित आहार-विहार व योग-प्राणायाम यासंदर्भात सुद्धा समुपदेशन करणे गरजेचे आहे. संसद सदस्य म्हणून जनतेच्या विविध क्षेत्राशी संबंधित वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी शत प्रतिशत योगदान देत असतानाच वैद्यकीय व्यवसायिकांच्या विविध शासकीय विभागाशी निगडित तांत्रिक अडचणी व विषयासंदर्भात आवश्यक मदत तथा सदरील प्रक्रिया सहज व सुकर होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील यांनी वैद्यकीय व्यावसायिक व समाज यांच्यामध्ये सुसंवाद यामध्ये रोगनिदान शिबिरे व आरोग्य प्रबोधन-समूपदेशन कार्यक्रमांची मोलाची भूमिका आहे. त्यामुळे डॉक्टरांनी आपापल्या परीने यासाठी योगदान देणे अत्यावश्यक आहे असे सांगितले.

याप्रसंगी डॉ.गोविंद सोनकांबळे,डॉ.राजकुमार घोणसीकर,डॉ.चंद्रकांत कोठारे यांची शुभेच्छापर समायोचित भाषणे झाली.

सदरील कार्यक्रम प्रसंगी खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या हस्ते क्षयरोगाच्या व्यक्तींना सकस आहार पुरवठा या भूमिकेतून भारत सरकारच्या निश्चय मित्र या संकल्पनेनुसार तीन महिन्यांचा पोषक आहार वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कालिदास बिरादार व डॉ.प्रशांत बिरादार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.जावेद अत्तार यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.दत्तात्रय पवार,डॉ.श्रीकांत मध्वरे,डॉ.शिवलिंग सोनटक्के,डॉ. संजय चाकूरकर,डॉ.सचिन टाले,डॉ.विजय बिरादार,डॉ. सुनील बनशेळकीकर,डॉ.अजय सोनटक्के,डॉ.दीपक केंद्रे,डॉ. गुरुराज वरनाळे,डॉ.बालाजी बिरादार,डॉ.संतोष बिरादार,डॉ. संगमेश्वर दाचावार,डॉ. राहुल जगताप,डॉ.संजय चिल्लरगे,डॉ.संजीव बिरादार,डॉ. किशोर बुबणे,डॉ.चरणदास गाडेकर,डॉ.योगेश सुरनर,डॉ. प्रवीण बलुतकर,डॉ. राखी वरनाळे,डॉ.शितल जाधव,डॉ.अजित पाटील,डॉ. अंतेश्र्वर हावन्ना डॉ.हरेश्र्वर सुळे,डॉ.स्नेहल पाटील डॉ. शिवकांता चेटलुरे,डॉ. रश्मी सुखदेवे,डॉ.प्रीती रोडगे,डॉ.योगीराज चिद्रे,डॉ. नंदकिशोर पांचाळ,डॉ.प्रवीण मुंदडा,डॉ.महेश भातांब्रे,डॉ. शिवकुमार होटुळकर,डॉ. विष्णुकांत जाधव डॉ.विष्णुकांत मुंडे,डॉ.धनराज मुळे,डॉ.पंकज मुंडे आदींचे सहकार्य लाभले.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य दिव्य पुतळा उभारणार : बनसोडे



उदगीर : गेल्या अनेक दशकापासुन उदगीर शहरात विश्र्वरत्न प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करावा अशी मागणी समाजबांधव व आंबेडकरप्रेमी जनतेतून होत होती. त्यांच्या मागणीचा विचार करुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासाठी आपण शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन दिला असुन आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे भुमीपुजन करून याच ठिकाणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य दिव्य पुतळा उभारणार असल्याची ग्वाही क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या भूमीपूजन सोहळयाप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, जिल्हा पोलीस उप अधिक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, पोलीस निरीक्षक अरविंद पवार, पो.नि. करण सोनकवडे, देविदास कांबळे, सेवानिवृत्त न्यायधिश भाले, श्रीरंग कांबळे, मनोहर कांबळे, देविदास कांबळे, समीर शेख, बालाजी भोसले, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, मुकेश भालेराव, माजी नगरसेवक राजकुमार भालेराव, नरसिंग शिंदे, जितेंद्र शिंदे, दयानंद शिंदे, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, संघशक्ती बलांडे, गौतम पिंपरे, मदन तुळजापुरे, सुशिलकुमार शिंदे, प्रफुल्लकुमार उदगीरकर, अविनाश गायकवाड, राहुल सोनवणे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मी गेल्या ३० वर्षापासून राजकारण सक्रीय असुन या कालावधीत राजकारण न करता केवळ समाजकारण करुन सर्व समाजाच्या घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

आज मी जे काही आहे ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच म्हणून माझी तर ईच्छा होतीच पण समाज बांधवांच्या मागणीचा विचार व त्यांच्या भावनेचा आदर करुन विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयासाठी निधी उपलब्ध करुन घेवुन पुतळाही तयार केला काही दिवसातच आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करुन उदगीर शहरात पंचधातुचा भव्य - दिव्य पुतळा उभारणार असल्याचे सांगितले.

यावेळी समाजबांधव व आंबेडकरप्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोककलेला प्रामाणिकपणे जोपासा :प्रमिला लोदगेकर




उदगीर : प्रतिकूल परिस्थितीवर मात करतच यशाचे शिखर गाठता येते. त्यामुळे गरिबी परिस्थितीविषयी नकारात्मकता बाळगण्यापेक्षा आपण कलेवर प्रेम केले पाहिजे. कला कोणतीही असो ती प्रामाणिकपणे जोपासा, असे मत उस्ताद बिस्मिल्ला खान राष्ट्रीय युवा पारितोषक विजेत्या लोककलावंत प्रमिला लोदगेकर यांनी व्यक्त केले. त्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन उदयोत्सव - २०२४ च्या समारोप समारंभ व पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, सहसचिव ड.एस. टी.पाटील, डॉ.आर.एन.लखोटिया, सदस्य बसवराज पाटील नागराळकर, बसवराज पाटील मलकापूरकर, शिवराज वल्लापुरे, मन्मथ बिरादार, प्रशांत पेन्सलवार, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष रमेशअण्णा अंबरखाने, महाविद्यालय विकास समिती सदस्य पंडित सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के.मस्के, उपप्राचार्य एस.जी. कोडचे, प्रा.जे.आर.कांदे, प्रा.एस.व्ही.मुडपे, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रभारी डॉ. सुरेश लांडगे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना लोदगेकर म्हणाल्या, आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उच्चविद्या विभूषित होण्याचे स्वप्न बाळगा. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यायाने सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्वतःचा एक वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. तो आपण सर्वांनी जोपासावा, असे आवाहन उपस्थितांना केले. उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तानाजी चेरले म्हणाले, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्र्चित करून वाटचाल करावी. आई-वडील व गुरुजनांना सार्थ अभिमान वाटेल असे कर्तृत्व साध्य करावे. सुप्रसिद्ध निवेदिका प्रा.शोभा कुलकर्णी म्हणाल्या, स्नेहसंमेलनातून कलाकार घडत असतात. मराठवाड्याची माती कर्तुत्वासाठी नेहमीच प्रेरक राहिली आहे, याचा सार्थ अभिमान आपल्या सर्वांना असावा.

अध्यक्षीय समारोप करताना रामचंद्र तिरुके म्हणाले, समाजाने लावणीकडे, लोककलावंताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा प्रत्येक कला ही सांस्कृतिक कलात्मकतेमध्ये भरच टाकत असते त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून आपले स्वप्न साकार करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. मल्लेश झुंगास्वामी यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा नामवाड व सुष्मिता बोरगावकर यांनी तर आभार विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्राध्यापक डॉ.सुरेश लांडगे यांनी मानले.

# प्रसिद्ध निवेदिका सौ. शोभा कुलकर्णी यांची सैनिकी विद्यालयास सदिच्छा भेट



उदगीर/ प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयास प्रसिद्ध निवेदिका, साहित्यिका सौ. शोभा कुलकर्णी यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यालयाची पाहणी केली.

संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस बसवराज म. पाटील नागराळकर साहेब यांनी प्रमुख पाहुण्या सौ. शोभा कुलकर्णी यांचा सत्कार केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीपाद कुलकर्णी, प्राचार्य वसंत कुलकर्णी, पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रसिद्ध निवेदिका सौ. शोभा कुलकर्णी यांनी सैनिकी विद्यालयाचा परिसर पाहून मी खूपच भारावून गेले आहे, असे सांगितले. पूढे बोलताना त्या म्हणाल्या, संस्थेचे अध्यक्ष बसवराज म. पाटील नागराळकर साहेब यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय तर आहेच त्यासोबतच शैक्षणिक क्षेत्रातील योगदान ही कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांचे संचलन, शिस्त उच्च दर्जाचे आहे. उदगीर सारख्या परिसरात इतक्या चांगल्या पद्धतीने नागराळकर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपण सैनिकी विद्यालय चालवत आहात त्याबद्दल मी सर्वच कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड यांनी केले तर आभार पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांनी मानले. यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद अकनगिरे, सुनील महिंद्रकर, झेटिंग कांबळे, अमित आग्रे, नंदू कोमटवाड यांनी सहकार्य केले.

# महेश विद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा



उदगीर / प्रतिनिधी- महेश प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर येथे महिला महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष कवी श्रीमती.मंगलताई शेटे , यशवंत विद्यालयाच्या माजी शिक्षिका योगगुरु श्रीमती. कलावती भातंबरे , राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा कार्याध्यक्ष श्रीमती.दिपाली आवटे पोलीस डिपार्टमेंट मध्ये कार्यरत असलेल्या होमगार्ड श्रीमती. छबुताई पाचंगे , रोटरी क्लबच्या सचिव, सामाजिक कार्यकर्ते श्रीमती चौधरी , आयुर्धन फिटनेस सेंटरच्या संचालिका श्रीमती . वट्टमवार ,गंगापूरच्या सरपंच श्रीमती. सुनिता स्वामी , लोणेश्र्वर विद्यालयाच्या प्राचार्य शोभाताई कल्याणी तर अध्यक्ष. म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती .प्रतिभाताई बिरादार इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला त्यात विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या महिलांच्या जीवनावर प्रकाश टाकला व महिला दिनानिमित्त विविध गाण्यावर सुंदर असे नृत्य सादर केले त्यातफब्बाई पण भारी देवा मया गीतावरील नृत्यने उपस्थित सर्वांचे आकर्षण ठरले तसेच सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनावरील गीतातून सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनाची यशोगाथा विद्यार्थ्यांनी मांडली मुलींचे महत्त्व पटवून देण्यासाठी सुंदर अशी नाटिका सादर केली व त्यातून बेटी बचाव बेटी पढाव हा मोलाचा संदेश देण्यात आला.

सदरील कार्यक्रमात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती भातंबरे यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक केले तर प्रमुख पाहुण्या श्रीमती मंगलताई शेटे यांनी महिलावर आधारित स्वरचित सुंदर अशी कविता सादर केली श्रीमती. आवटे यांनी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल त्यांचे तोंड भरून कौतुक केले श्रीमती चौधरी यांनी विद्यार्थ्यांना महिला दिनाचे महत्त्व पटवून सांगितले व आरोग्य विषयक सूचना मुलींना दिल्या तर अध्यक्ष. समारोपात श्रीमती. प्रतिभाताई बिराजदार यांनी शाळेच्या प्रगतीचा लेख प्रमुख पाहुण्यांना सांगितला व महिला दिन का साजरा केला जातो याचे महात्मे विद्यार्थ्यांना पटवून सांगितले, या कार्यक्रमात वर्ग सहावी (ब) मधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व सहभागी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका श्रीमती. निशा भिंगोरे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कु. स्वरांजली दिनेश पाटील या विद्यार्थ्यांनी केले हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता, हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल संस्थेचे संस्थापक श्रीमान टी.व्ही. बिरादार ,संस्थेचे सचिव प्रवीण बिरादार , संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. अशोक देवांगरे आदींनी सर्वांचे कौतुक केले आहे.